**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com








* वर्ष ६ * अंक १२३ * * नाशिक * रविवार, दिनांक २० एप्रिल २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## थोडक्यात

### राज्यातील शिक्षकांना ड्रेस कोड लागू होणार !

■ **मुंबई** : शालेय शिक्षकांना राज्यात ड्रेसकोड लागू होणार, असे सूतोवाच शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केले आहे. ड्रेस कोडसाठी शासन निधी उपलब्ध करुन देणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. राज्यातील शाळांमध्ये ड्रेसकोड लागू झाल्यानंतर शिक्षकांना त्यांच्या मनाप्रमाणे कोणतेही कपडे घालता येणार नाहीत.

### मुलीवर बलात्कार २० दिवसांत जन्मठेप

■ **नवी दिल्ली** : दिल्लीच्या तीस हजारी न्यायालयाने १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार आणि गर्भधारणा केल्याबद्दल ४५ वर्षीय पुरूषाला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने या गंभीर प्रकरणावर अवघ्या २० दिवसांत निकाल दिला आणि म्हटले की, दोषीला आजीवन तुरुंगात राहावे लागेल. न्यायालयाने पीडितेला १९.५ लाख रुपये भरपाई देण्याचे आदेशही दिले. न्यायालयाने म्हटले आहे की जेव्हा आरोपीने मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यास सुरुवात केली तेव्हा तो ४५ वर्षांचा होता आणि मुलगी फक्त १६ वर्षांची होती.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश (एएसजे) बबिता पुनिया यांनी सांगितले की, दोघांमध्ये सुमारे ३० वर्षांचा फरक होता. वयातील इतका मोठा फरक हा विषय आणखी गंभीर बनवतो. पीडित मुलीला असह्य वेदना झाल्या असतील यात मनात शंका नाही.

खरं तर, आरोपी पीडितेच्या वडिलांचा ओळखीचा होता आणि ती त्यांना काका म्हणत असे. त्याने मुलीवर अनेक वेळा बलात्कार केला आणि तिला गर्भवती केले.

# कलह मिटणार!

## उद्धव, राज एकत्र येण्याचे संकेत

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**

राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र येणार का? हा अवघ्या महाराष्ट्राला पडलेला प्रश्न आहे. यापूर्वी राज यांनी स्वतःहून पुढे येत उद्धव ठाकरे यांना टाळी देण्याचा प्रयत्न केला. पण उद्धव यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

आता मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा उद्धव यांच्यासोबत युती करण्याचे सकारात्मक संकेत दिलेत. 'महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी आमच्यातील वाद, भांडणे व इतर गोष्टी फार क्षुल्लक आहेत. त्यामुळे एकत्र येणे व एकत्र राहणे यात फार काही कठीण गोष्ट आहे असे मला वाटत नाही,' असे ते म्हणालेत.



राज ठाकरे यांनी अभिनेते व दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या वॅको सॅनिटी या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी विविध मुद्यांवर परखड भाष्य केले.

दरम्यान, उद्धव ठाकरेंचेही राज ठाकरेंना टाळी देण्याचे संकेत मिळत आहेत. राज ठाकरे यांच्या या प्रस्तावाला उद्धव ठाकरे यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. महाराष्ट्र व मराठी माणसाच्या हितासाठी माझीसुद्धा आपसातील किरकोळ वाद बाजूला ठेवण्याची तयारी आहे, असे उद्धव ठाकरे म्हणालेत.

उद्धव ठाकरे मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले, मराठीसाठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी अगदी किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला मी सुद्धा तयार आहे. मी सर्व मराठी माणसांना मराठी व महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र येण्याचे आवाहन करतो.

पण माझी अट एक आहे. लोकसभा निवडणुकीवेळी आम्ही हे लोक महाराष्ट्रातील सर्व उद्योगधंदे हे लोक गुजरातला घेऊन जात होते. तेव्हाच तुम्ही विरोध केला असता तर आज हे सरकार तिकडे (दिल्लीत) बसले नसते. तिथे आम्ही महाराष्ट्राच्या हिताच्या विचार करणारे सरकार केंद्रात बसवले असते. राज्यात सुद्धा आपल्या महाराष्ट्राच्या विचार करणारे सरकार बसले असते. आमच्यात माझ्याकडून कोणतीही भांडणे नव्हतीच. होती, तर मी आजच ती मिटवून टाकली. चला, पण प्रथम ठरवा महाराष्ट्राचे हित, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

दरम्यान, दोन्ही भावांनी एकत्र येण्याचे संकेत दिल्याने आगामी काळात राजकारणात मोठी उलथापालथ होवू शकते.

## संग्राम थोपटे यांचा काँग्रेसला रामराम

■ **वृत्तसंस्था**
**पुणे, दि. १९ :**



काँग्रेसचे पुणे विभागातील बडे नेते तथा माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेसच्या पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

भाजप प्रवेशाचा निर्णय पक्का झाल्यामुळे त्यांनी काँग्रेसचा हात सोडला. त्यांनी आपला राजीनामा ईमेलद्वारे पक्षश्रेष्ठींना पाठवला. आता थोपटे आपल्या समर्थकांचा मेळावा घेऊन याविषयीची अधिकृत घोषणा करणार असल्याची माहिती आहे.

संग्राम थोपटे हे भोर - वेल्हे - मुळशी या विधान मतदारसंघाचे सलग ३ वेळा आमदार राहिले होते. पण यंदाच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातीतल राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार शंकर मांडेकर यांनी त्यांना धूळ चारली होती. या पराभवानंतर ते काँग्रेसपासून दूर गेले होते.

ही संधी साधून भाजपचे दौंडचे आमदार राहुल कुल यांनी त्यांच्या मध्यस्थीने त्यांची भाजपशी जवळीक वाढली. त्यातून त्यांचा भाजपच्या नेतृत्वाशी संपर्क झाला.

जम्मू-काश्मीरसह दिल्ली-एनसीआरमध्ये

## भूकंपाचे सौम्य धक्के

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १९ :**

शनिवारी दुपारी १२:१७ वाजता अफगाणिस्तानात ५.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंपाचे धक्के जम्मू-काश्मीर आणि दिल्ली-एनसीआरपर्यंत जाणवले. तथापि, अद्याप जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.

राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या म्हणण्यानुसार, भूकंपाचे धक्के जम्मू आणि काश्मीरच्या काही भागातही जाणवले. श्रीनगरमधील एका स्थानिक व्यक्तीने सांगितले- मला भूकंपाचे धक्के जाणवले. मी ऑफिसमध्ये होतो तेव्हा माझी खुर्ची हलली. काही भागात लोक घरे आणि कार्यालयांमधून बाहेर पळताना दिसले.

राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंदानुसार, भूकंप पृष्ठभागापासून ८६ किलोमीटर खाली झाला. त्याचा केंद्रबिंदू अफगाणिस्तान-ताजिकिस्तान सीमावर्ती भागात होता. हा भाग भूकंपाच्या दृष्टीने संवेदनशील मानला जातो. या भागात भूकंप होणे सामान्य आहे. १६ फेब्रुवारी रोजी सोमवारी पहाटे ५:३६ वाजता दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. अडीच तासांनंतर, सकाळी ८ वाजता, बिहारमधील सिवानलाही भूकंपाचा धक्का बसला.

दोन्ही ठिकाणी भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४ मोजण्यात आली. भूकंपाचे केंद्र नवी दिल्ली होते आणि त्याची खोली पाच किलोमीटर असल्याचे सांगितले जात आहे. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजी (ठउर) ने या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ही माहिती दिली.

भूकंपाच्या जोरदार धक्क्यांमुळे दिल्ली, नोएडा, ग्रेटर नोएडा आणि गाझियाबादमधील लोक घाबरून घराबाहेर पडले. तथापि, आतापर्यंत कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूकंपाबाबत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर ट्विट केले. त्यांनी लोकांना शांत राहण्याचे आवाहन केले. अधिकारी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत असेही त्यांनी सांगितले.

## गडकरींच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या वतीने डॉक्टरेट (डी. एस्सी., डॉक्टर ऑफ सायन्स) प्रदान करण्यात आली. या डॉक्टरेटमुळे गडकरी यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

विद्यापीठाच्या वतीने आयोजित २६ व्या दीक्षांत समारोहामध्ये काही अपरिहार्य कारणांमुळे गडकरी यांना उपस्थित राहता आले नव्हते.



सातव्यांदा डॉक्टरेट

त्यामुळे शनिवार, १९ एप्रिलला परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. इंद्र मणी यांनी गडकरी यांच्या निवासस्थानी आयोजित अनौपचारिक सोहळ्यात ही डॉक्टरेट प्रदान केली.

यापूर्वी देखील गडकरी यांना महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, आसाम राज्यातील विद्यापीठांनी डॉक्टरेटने गौरविले आहे. यामध्ये राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उत्तर प्रदेश येथील गलगोटियाज विद्यापीठ, गुवाहाटी येथील आसाम डाऊन टाऊन विद्यापीठ, गाझियाबाद येथील एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी यांचा समावेश आहे.

# चार जहाल नक्षलवाद्यांना अटक



४ महिलांचा समावेश : ४० लाखांचे बक्षीस : चौघांवर १३० गुन्हे दाखल

■ **महासागर प्रतिनिधी**
**गडचिरोली, दि. १९ :**

दिरंगी-फुलनार चकमकीत एका सी-६० जवानाच्या हत्येमध्ये सक्रिय सहभाग असलेल्या चार जहाल माओवाद्यांना पोलिस व सिआरपीएफने शनिवारी अटक केली.

सायलु भुमय्या मुड्डेला ऊर्फ रघु ऊर्फ प्रताप ऊर्फ इरपा (डीव्हीसीएस, दक्षिण गडचिराली डिव्हीजन), (वय ५५), रा. लिंगापूर, तह. दरपेल्ली, जि. निजामाबाद (तेलंगाना) (जैनी खराटम हिचा पती), जैनी भिमा खराटम ऊर्फ अखीला ऊर्फ रामे (डिव्हीसीएम, भामरागड दलम/सचिव भामरागड एरीया कमिटी), (वय ४१), रा. कंचाला, तह. भोपालपट्टानम, जि. बीजापूर (छ.ग.) (सायलु मुड्डेला ऊर्फ रघु याची पत्नी), झाशी दोघे तलांडी ऊर्फ गंगु (सदस्य, भामरागड दलम), (वय ३०), रा. येचली, तह. भामरागड जि. गडचिरोली, मनिला पिडो गावडे ऊर्फ सरिता (सदस्य, भामरागड दलम), (वय २१), रा. कापेवंचा तह. अहेरी, जि. गडचिरोली असे अटक करण्यात आलेल्या जहाल माओवाद्यांची नावे आहेत. शासनाने चौघांवर ४० लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

उपविभाग भामरागड अंतर्गत पोस्टे ताडगाव येथील पोलीस पथक व सिआरपीएफच्या एफ कंपनीचे जवान संयुक्तपणे माओवादीविरोधी अभियान राबवित असताना पल्ली जंगल परिसरामध्ये त्यांना चार संशयित व्यक्ती फिरत असताना आढळून आजे . जवानांनी त्यांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर त्यांची अधिक सखोल चौकशी करण्यासाठी पोलीस उप-मुख्यालय प्राणहिता येथे आणले असता, सदर इसमांनी वरील प्रमाणे आपली नावे सांगितले. अधिक चौकशी केली असता सदर चौघे घातपात घडवून आणण्याच्या उद्देशाने ते पल्ली जंगल परिसरात रेकी करण्यासाठी दाखल झाले होते. या ११ फेब्रुवारी २०२५ रोजी चकमकीमध्ये एका पोलीस जवानाच्या हत्येमध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता, असे निष्पन्न झाल्याने त्यांना पोस्टे कोठी येथे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) संदिप पाटील, पोलीस उप-महानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र अंकित गोयल, उप-महानिरीक्षक (अभियान) सीआरपीएफ अजय कुमार शर्मा, पोलीस अधीक्षक गडचिरोली नीलोत्पल, कमांडंट ९ बटा. सिआरपीएफ शंभू कुमार, अपर पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, एम. रमेश, सत्य साई कार्तिक, पोलीस उप-अधीक्षक विशाल नागरगोजे व उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे ताडगाव व सिआरपीएफच्या अधिकारी व जवान यांनी पार पाडली.

## थोपटेंना थांबवण्याचे काँग्रेसचे प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**



पुण्यातील भोर मतदारसंघाचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेस पक्षाचा प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. या प्रकरणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली आहे.

सपकाळ यांनी सांगितले की, अनंत थोपटे हे काँग्रेसचे स्वाभिमानी आणि ज्येष्ठ नेते आहेत. त्यांच्या कुटुंबात संघषार्चा वारसा आहे. मागील काळात संग्राम थोपटे यांना विधानसभा अध्यक्षपदासाठी काँग्रेसने निश्चित केले होते. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी तत्कालीन राज्यपाल कोश्यारी यांच्यावर दबाव आणून निवडणूक लावू दिली नाही.

सपकाळ यांनी शिवसेना फोडण्याच्या राजकारणावरही टीका केली. त्यांच्या मते, या प्रकरणात संविधानाचे नियम पायदळी तुडवले गेले. फडणवीस यांनी काँग्रेस आणि महाराष्ट्राचे नुकसान केले आहे. दरम्यान, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरणावरही सपकाळ यांनी भाष्य केले. ससून रुग्णालयाने दिलेल्या क्लीन चीट वर त्यांनी नाराजी व्यक्त केली. सपकाळ यांनी आरोप केला की सरकार या प्रकरणात आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे.

## इंग्रजीला पालख्या, हिंदीला विरोध.... हा कुठला विचार? फडणवीसांचा सवाल

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पुन्हा एकदा इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याच्या आपल्या सरकारच्या निर्णयाचे जोरदार समर्थन केले. इंग्रजीला पालख्या व हिंदीला विरोध हा कुठला विचार आहे? असा खडा सवाल त्यांनी यासंबंधी उपस्थित केला आहे. यावेळी त्यांनी नाशिक येथील दंगल जाणिवपूर्वक घडवण्यात आल्याचाही दावा केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकाळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, नाशिक येथे जाणिवपूर्वक दंगल घडवण्याचा प्रयत्न झाला. न्यायालयाच्या निर्णयानंतर तेथील लोकांनी वादग्रस्त अतिक्रमण काढण्याविषयी प्रशासनाला सांगितले. त्यानंतर त्यांनी स्वतःच ते अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. पण त्याचवेळी ही सगळी मंडळी जी दंगलीमध्ये दिसत आहेत, त्यांनी जाणिवपूर्वक दंगल घडवली. त्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई केली जात आहे.

पत्रकारांनी यावेळी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पाणी टंचाईच्या मुद्यावरून सरकारवर केलेली टीका मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा कोण संजय राऊत? असे म्हणत या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. राज्यातील पाणी टंचाई आणि अन्य मुद्यांवरही त्यांनी भाष्य केले.

## चाकूने जिवे मारण्याचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**

मुलाशी असलेल्या भांडणाचा वचपा काढण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तरुणाने आपल्या दोन साथीदारांसोबत वडिलांवर हल्ला केला. चाकूने हात आणि पायावर मारून गंभीर जखमी केले. ही खळबळजनक घटना यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी जखमी निसार खान अब्दुल खान (५१) रा. वांजरा लेआऊट, वनदेवीनगर यांच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध जिवे मारण्याचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदवत एकाला अटक केली. सय्यद इरशाद उर्फ गुड्डू सय्यद अजीज (२६) रा. वनदेवीनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याचे दोन साथीदार फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत निसार खान यांची यशोधरानगरच्या संतोषनगर चौकात चहाची टपरी आहे. आरोपी गुड्डूचा त्यांच्या मुलाशी जुना वाद आहे.

## भारतात लवकरच पुन्हा आठ चित्त्यांचे आगमन

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**

चित्ता स्थलांतर प्रकल्पाअंतर्गत दक्षिण आफ्रिकेतील बोत्सवाना येथून पुन्हा एकदा भारतात आठ चित्ते आणले जाणार आहेत. दोन तुकडीत हे चित्ते भारतात आणण्यात येणार आहेत. त्यापैकी पहिल्या तुकडीत चार चित्ते येत्या मे महिन्याच्या अखेरपर्यंत आणले जाणार असल्याची शक्यता आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने ही माहिती दिली असून याबाबत मध्यप्रदेश सरकारने एक प्रसिद्धीपत्रक दिले आहे. शुक्रवारी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत चित्ता प्रकल्पाची आढावा बैठक घेण्यात आली. दक्षिण आफ्रिका, बोत्सवाना आणि केनिया येथून भारतात चित्ते आणण्यात येणार आहेत. हे चित्ते दोन तुकड्यांमध्ये भारतात आणले जातील.

बोत्सवाना येथून चार चित्ते मे महिन्यापर्यंत आणि त्यानंतर आणखी चार चित्ते आणले जातील. दरम्यान, भारत आणि केनिया यांच्यातील करार अंतिम टप्प्यात आला आहे, असेही या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या पीएफवरील १०० कोटींचे व्याज बुडाले

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**

सर्वसामान्य जनतेची जिवनवाहिनी असणाऱ्या एसटीच्या कर्मचाऱ्यांच्या पीएफवरील १०० कोटींचे व्याज बुडित निघाल्याचा दावा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे. यामुळे एसटी कर्मचाऱ्यांत खळबळ माजली आहे.



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील ८७ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या पगारातून कपात केलेली १२४० कोटींची रक्कम एसटीने ईपीएफमध्ये भरलीच नसल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली आहे.

श्रीरंग बरगे म्हणाले की, एसटी कर्मचाऱ्यांचे पीएफ व ग्रॅच्युइटीचे दोन स्वतंत्र ट्रस्ट आहेत. ८७ हजार एसटी कर्मचारी व अधिकारी यांचा भविष्य निर्वाह निधी म्हणजेच पीएफची अंदाजे 1240 कोटी व उपदान म्हणजे ग्रॅच्युइटीचे अंदाजे ११०५ कोटी रुपये इतकी रक्कम अशी मिळून एकूण २३४५ कोटी रुपयांची रक्कम फेब्रुवारी २०२४ पासून एसटीने दोन्ही ट्रस्टकडे भरणा केली नाही. कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केली जाणारी ही रक्कम पीएफ ट्रस्टकडे भरणा केली जाते. त्यानंतर ट्रस्ट ही रक्कम इतरत्र गुंतवणूक करते. त्यावरील येणाऱ्या व्याजातून कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर सदरची रक्कम ८.२५ टक्के एवढ्या दराने परत केली जाते.

पण मागील अनेक महिन्यांपासून एसटीने ही रक्कम गुंतवणूक केली नाही. त्यामुळे त्याच्यावरील व्याज व चक्रवाढ व्याज बुडाले असून, त्याचा फटका कर्मचाऱ्यांना बसणार आहे.

संपानंतर शासनाने नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने कर्मचाऱ्यांच्या वतेनाला लागणारी पूर्ण रक्कम राज्य सरकार एसटीला देईल असे शपथपत्र कोर्टात दिले होते. पण त्यानंतर केव्हाही पूर्ण रक्कम देण्यात आली नाही. परिणामी पीएफ ट्रस्ट अडचणीत सापडली आहे.

ते पुढे म्हणाले, पीएफ व ग्रॅच्युइटी या दोन्ही ट्रस्ट वर्षानुवर्षे चांगल्या प्रकारे चालल्या होत्या. ईपीएफओच्या कार्यालयानेही या ट्रस्टचे कौतुक केले आहे. पण सरकारच्या उदासिनतेमुळे या दोन्ही ट्रस्ट संकटात सापडल्या आहेत. सुदैवाने राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे एसटीच्या अध्यक्षपदाचा पदभार देण्यात आला आहे. त्यांनी ही रक्कम एसटीला व्याजासहित मिळवून देण्याचा प्रयत्न करावा, अशी मागणीही बरगे यांनी या प्रकरणी केली आहे.

**ईपीएफओच्या नियमांची पायमल्ली**

ईपीएफओने काही नियम, अटी व शर्थींसह सदर ट्रस्टला मान्यता दिली आहे. आता या नियमांची पूर्णतः पायमल्ली होत आहे. ईपीएफओने ट्रस्टवर कारवाई केल्यास कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते, अशी भीती त्यांनी यावेळी व्यक्त केली.

जोस बटलरच्या ९७ धावांमुळे गुजरात विजयी

## दिल्लीचा ७ विकेट्सने पराभव

■ **वृत्तसंस्था,**
**स्पोर्ट्स डेस्क, दि. १९ :**

जोस बटलरच्या ९७ धावांच्या मदतीने गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ७ विकेट्सने पराभव केला. गुजरातने हंगामातील पाचवा विजय नोंदवला, तर दिल्लीला दुसरा पराभव पत्करावा लागला. प्रसिद्ध कृष्णाने ४ बळी घेतले. बटलरने शेरफान रदरफोर्डसोबत शतकी भागीदारीही केली.



गुजरातने शुक्रवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दिल्लीने ८ विकेट गमावल्यानंतर २०३ धावा केल्या. गुजरातने २० व्या षटकात केवळ ३ गडी गमावून लक्ष्य गाठले. ९७ धावा करणाऱ्या बटलरला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

दिवसाच्या दुसऱ्या सामन्यात, राजस्थान रॉयल्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होईल. हा सामना जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर संध्याकाळी ७:३० वाजता खेळला जाईल. २० व्या षटकात गुजरातला जिंकण्यासाठी १० धावांची आवश्यकता होती. मिचेल स्टार्क गोलंदाजी करायला येतो. राहुल तेवतियाने पहिल्या चेंडूवर षटकार आणि दुसऱ्या चेंडूवर चौकार मारून संघाला विजय मिळवून दिला. १९ व्या षटकात गुजरात टायटन्सने तिसरी विकेट गमावली. षटकाच्या पाचव्या चेंडूवर मुकेश कुमारने उंच फुल टॉस टाकला, शेरफान रुदरफोर्ड लाँग ऑफ पोझिशनवर झेलबाद झाला. १५ व्या षटकात जोस बटलरने मिचेल स्टार्कविरुद्ध सलग ५ चौकार मारले. त्याने स्टार्कच्या पहिल्या ५ चेंडूंवर चौकार मारले आणि शेवटचा चेंडू डॉट म्हणून खेळला.

## ➤ महत्त्वाचे

### नासिकरोड-देवळाली व्यापारी बँकेच्या सल्लागारपदी सहाणे

**बेलगाव कुऱ्हे ।** इगतपुरी तालुक्यातील साकुर येथील प्रगतशील शेतकरी तथा अमृतराज टेडर्सचे संचालक उत्तमराव अमृता सहाणे यांची



दि नासिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँकेच्या साकुरफाटा येथील शाखा सल्लागार (निमंत्रित) म्हणून बँकेचे चेअरमन दत्ता गायकवाड, जेष्ठ संचालक निवृत्ती अरिंगळे, संचालक मंडळ यांनी नुकतीच नेमणुक केली. सहाणे यांची कामाप्रति असलेली आस्था तसेच शेतकऱ्यांबद्दल असलेला जिव्हाळा बँकेच्या विकासाबद्दल असलेली आत्मीयता याची दखल घेऊन बँकेच्या शाखा सल्लागार म्हणून वर्णी लागल्याने शेतकरी बांधवांनी आनंद व्यक्त करीत त्याचे अभिनंदन केले. शाखेस वेळोवेळी भेट देवून ठेवी, कर्जे व व्यवसाय वृध्दीसाठी तसेच थकबाकी व एनपीए कमी करण्यासाठी सहकार्य करू तसेच बँकेच्या माध्यमातून शेतकरी बांधव व बँकेच्या विकासाबद्दल कटिबद्ध असल्याचे नवनिर्वाचित सल्लागार सहाणे यांनी सांगितले.

### निर्मल हास्य केंद्रातर्फे पर्यावरणप्रेमींचा सत्कार

**नाशिक ।** नाशिकची ओळख ३०-४० वर्षांपूर्वी थंड हवेचे ठिकाण म्हणून केली जात होती; परंतु विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात जुन्या देशी झाडांची कत्तल करण्यात आली व आज नाशिकचे तापमान ४० हून अधिक झाले आहे. अशा परिस्थितीत देखील



नाशिक मधील काही पर्यावरणप्रेमी नि:स्वार्थ भावनेने वृक्षारोपण करून झाडे जगवत आहेत. अशा सर्वांचा इंदिरानगर येथील अजय मित्र मंडळ येथील निर्मल हास्य केंद्राने सत्कार केला. पर्यावरणप्रेमी डॉ संदीप भानोसे, नंदू काळे, संजय फडके ,श्री श्रीपाद कुलकर्णी ,सौ श्रद्धा जोगळेकर, निलय जोगळेकर व राहुल पांढुरलीकर यांचा सत्कार संपन्न झाला. निर्मल हास्य केंद्राचे सदस्य गीता पोळ, शैलजा कुलकर्णी, दिनकर कुलकर्णी, परशुराम सोनवणे, अरुण चुंबळे, दत्ता जोशी, रंजना जोशी, रमेश देसाई व रमेश करवीर व इतर दीडशे कार्यकर्ते उपस्थित होते. शेवटी सर्वांनी मिळून वाहतूक सुरक्षा, पर्यावरण रक्षा अभियानात सहभाग नोंदवत २५८० सातत्यपूर्ण दिवसपूर्ण केले.

### आज सायंकाळी विनामूल्य 'पसंद अपनी अपनी' मैफल

**नाशिक ।** गायक संजय डेरे आणि अमर कुमार प्रस्तुत पसंद अपनी अपनी या सुरेल मैफलीचे आज रविवारी (दि.२०) आयोजन करण्यात आले आहे. ही विनामूल्य मैफल परशुराम साईखेडकर नाट्यगृहात सायंकाळी ६ वाजता होणार आहे. गायक अजय पाटील, मनोहर देवरे, सुभाष ईसोकर तसेच गायिका स्मिता पांडे, डॉ. रेखा सोनवणे, नीता पवार, डॉ.अनिता पाटील, नेहा आहेर, गायत्री नायक आदी कलाकार रसिकांच्या पसंतीची गाणी सादर करतील. उस्मान पटणी खुसखुशीत शैलीत निवेदन करणार असून, ध्वनीयंत्रणा कैलास काळे व तंत्रसहाय्य संजय गाडे यांचे आहे. सात्विक अश्विनी राहुल निरगुडे याने गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये दोरीवरील उड्यांचा विक्रम नोंदवला आहे. नाशिक म्युझिकल सोशल फाउंडेशनतर्फे त्याचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. थोर समाजसेवक बाबा आमटे यांचे सहकारी मुकुंद दीक्षित यांच्या हस्ते हा सन्मान होईल. रसिक नाशिककर श्रोत्यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### 'माझे हक्क माझ्या शब्दात' उपक्रम

**सिन्नर ।** बारागाव पिंपरी येथील जिल्हा परिषद शाळेत माझे हक्क माझ्या शब्दात या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी समता बंधुता आणि न्याय यासारख्या संविधानिक मूल्यांचा दैनंदिन जीवनात कसा वापर करावा यावर आधारित ति हस्तलिखित रंगभरण आणि भाषणांचे सुंदर संयोजन करण्यात आले होते. शिक्षक गोरक्ष सोनवणे यांच्या कल्पनेतून चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला मुख्याध्यापक नवनाथ हांडगे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक राजेंद्र पाटील, रोहिणी पगार, मनीषा शेळके, गोरक्ष काकड, अनिता बडदे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. विद्यार्थ्यांनी संविधानातील हक्कांची महत्त्वाची माहिती रंग भरण्याच्या माध्यमातून तसेच उगवत्या भाषणातून प्रस्तुत केली. आलोक जाधव याने भारतरत्न डॉ. बाबासाहेबांची वेशभूषा केली होती. गटविकास अधिकारी अशोक भवारी, गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे, विस्तार अधिकारी मंजुषा साळुंके, कैलास सांगळे, विजय बागुल, केंद्रप्रमुख इरफान पटेल, सरपंच संध्या कटके, उपसरपंच योगेश बोराडे, सुंदर डेंगळे आणि पालक शिक्षक संघ यांनीही विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

## कादवाच्या गळीत हंगामाची सांगता

### ३,५२,५५७ लाख मे. टन. ऊस गाळप; ३,९३,५०० क्विंटल साखर निर्मिती

**दिंडोरी ।** कादवा सहकारी साखर साखर कारखान्याने प्रतिकूल परिस्थिती असतानाही गळीत हंगामाची यशस्वी सांगता होत 3,52,557 मे.टन उसाचे गाळप करुन सरासरी 12.14% टक्के उतारा मिळवत 3,93,500 क्विंटल साखर निर्मिती केली आहे.

यंदा दुष्काळी स्थिती असल्याने उसाची उपलब्धता कमी असल्याने त्यातच ऊसतोड मजूर टंचाईने राज्यातील सर्वच कारखान्यांना अडचणींचा सामना करावा लागला आहे. कादवाने 130 दिवसात गळीत हंगाम पूर्ण केला असून, गळीत हंगाम सांगता चेअरमन श्रीराम शेटे यांचे हस्ते गव्हानीत नारळ टाकून झाली. यावेळी बोलताना श्रीराम शेटे यांनी हंगाम यशस्वी यशस्वी केल्याबद्दल ऊस उत्पादक, कामगार, ऊसतोड कामगार, ऊस वाहतूकदार, माल पुरवठादार यांचे आभार मानत पुढील वर्षी जास्तीत जास्त गाळप करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे सांगितले. इतर कारखान्यांनी गाळप क्षमता वाढवल्याने मोठया प्रमाणात ऊस पळवापळवी होत त्याचा फटका छोट्या कारखान्यांना बसत आहे. त्यामुळे कमी दिवसात जास्त गाळप करण्यासाठी कादवाची गाळप क्षमता वाढवावी लागेल, असे सांगितले. ऊस लागवड वाढविण्यासाठी दरवर्षी प्रमाणे उधारीने रासायनिक खाते इफको 10-26-26 वाटप करण्यात येइल तरी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस लागवड करावी व कादवाला ऊस पुरवठा करावा असे आवाहन श्रीराम शेटे यांनी केले. यावेळी युनियन अध्यक्ष भगवान जाधव यांची भाषणे झाली. यावेळी सर्व मुकादम यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रभारी कार्यकारी संचालक विजय खालकर यांनी केले. यावेळी व्हा. चेअरमन शिवाजीराव बस्ते,सर्व संचालक मंडळ, सर्व विभागाचे खातेप्रमुख,कामगार उपस्थित होते. कारखान्यातर्फे सभासदांना सवलतीच्या दरात दिली जाणारी साखरेची अंतिम मुदत बुधवार 30 एप्रिल असून, त्यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही तरी आपली सवलतीच्या दरातील साखर कारखाना कार्यस्थळावरुन घेवून जावी, असे आवाहन कादवा प्रशासनाने केले आहे. ४० लाख लिटर इथेनॉल निर्मिती. कादवाचे इथेनॉल प्रकल्पातून 13 एप्रिल अखेर 39 लाख 41 हजार 55 लिटर इथेनॉल निर्मिती झाली असून एप्रिल अखेर इथेनॉल प्रकल्प सुरु असणार आहे.

## मुंबई लोकल नाशिकपर्यंत धावण्याच्या मार्गावर!

### प्रवाशांसाठी दिलासादायक निर्णय



**देवळाली कॅम्प ।** मुंबई ते नाशिक दरम्यान हजारो प्रवासी दररोज प्रवास करतात. सध्या या प्रवाशांसाठी पंचवटी एक्स्प्रेस सारख्या काही निवडक गाड्यांचा पर्याय आहे; मात्र मुंबई लोकल थेट नाशिक पर्यंत पोहोचत नसल्याने प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या मागे मुख्य अडथळा होता तो कसारा घाटाचा. आता ही अडचण दूर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मनमाड ते कसारा या नव्या रेल्वे मार्गाला अंतिम मंजुरी मिळाल्यामुळे मुंबई लोकल सेवा नाशिकपर्यंत विस्तारली जाऊ शकते. या मार्गावर दोन मोठे बोगदे असून, कमी चढ-उताराचा फायदा रेल्वे वाहतुकीला गती देईल. नव्या मार्गा मुळे वेळेची व इंधनाची बचत होणार असून, मुंबई व नाशिक ही दोन महत्त्वाची शहरे लोकल सेवेने जोडली जाणार आहेत. या प्रकल्पासाठी माजी खासदार हेमंत गोडसे यांनी मोठा पाठपुरावा केला होता. त्यांनी तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे ही मागणी सातत्याने लावून धरली होती. याशिवाय, नव्या मार्गावर न्यू नाशिक रोड, न्यू पाडळी, वैतरणानगर आणि चिंचलखैरे ही चार नवीन स्थानके उभारली जाणार आहेत.

विशेषतः 'न्यू नाशिक रोड' हे स्थानक नाशिक शहराला अधिक चांगले जोडणार आहे. नाशिक ते मुंबई दरम्यान प्रवासी आणि मालवाहतूक वाढत असल्याने हा नवीन रेल्वेमार्ग खूप महत्त्वाचा ठरणार आहे. बोगद्यांचा डायमीटर वाढवण्यात येणार असल्यामुळे रेल्वेचा वेगही वाढणार आहे. या निर्णया मुळे प्रवाशांना अधिक वेगवान, सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासाचा लाभ होणार आहे.

## कर्करोग जनजागृतीसाठी सायकल रॅली

**नाशिक ।** जागतिक आरोग्य सप्ताह साजरा करण्यासाठी आणि महिलांच्या आरोग्य जागरूकतेला प्रोत्साहन देण्यासाठी नाशिक येथील अशोका कॅन्सर सेंटर्स ऑफ अमेरिका (सीसीए) तर्फे 'सायक्लेथॉन' चे आयोजन करण्यात आले होते.महिलांच्या आरोग्य आणि कल्याणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित केला जातो.



या वर्षीच्या जागतिक आरोग्य सप्ताहाची संकल्पना, "निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य-सक्रिय ती", अशी आहे. प्रत्येकाला, सर्वत्र दर्जेदार आरोग्यसेवा आणि माहिती मिळवण्याचा अधिकार आहे यावर ही संकल्पना भर देते. या जागतिक संदेशाशी सुसंगत, सीसीए नाशिक प्रतिबंधात्मक आरोग्य उपाय आणि सामुदायिक सहभागाद्वारे महिलांना सक्षम बनवण्याचे प्रयत्न करत आहे.सायक्लेथॉन हा त्या प्रयत्नांचाच एक भाग आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून लवकर निदान, वेळेवर तपासणी आणि सक्रिय आरोग्यसेवेचे महत्त्व याबद्दल सक्रियपणे जागरूकता निर्माण केली जाते. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिलांसाठी मोफत कर्करोग तपासणी पॅकेज 'प्रोॲक्टिव्ह ती' सारख्या उपक्रमांद्वारे सीसीए नाशिकने याबाबतीत महत्वाचे पाऊल उचलले आहे. या सायक्लेथॉनमध्ये १०० हून अधिक उत्साही सायकलस्वारांचा सहभाग होता.

## सजना चित्रपटाचं धमाल गाणं 'बुंगा फाईट' सर्वत्र धुमाकूळ घालतंय



**नाशिक ।** मराठी गाण्यांनी सध्या सोशल मीडियावर एक चांगला ट्रेंड सेट केलाय. सर्वत्र मराठी गाणी वाजताय आणि गाजताय सुद्धा. अशातच आणखी एका मराठी गाण्याने सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातलाय. शशिकांत धोत्रे दिग्दर्शित सजना चित्रपटाचं धमाल गाणं "बुंगा फाईट" हे मराठी गाणंही आता रसिकांच्या पसंतीस उतरतंय. त्यामुळे सोशल मीडियावर सध्या याच गाण्याची चर्चा सुरु आहे.

सजना चित्रपटातला "बुंगा फाईट" हे गाणं एक पॉप्युलर डान्स नंबर ठरत आहे ह्यात काही शंका नाही. प्रेक्षक आत्ताच ह्या गाण्यावर थिरकायला लागली आहेत. अनेक कार्यक्रमांमध्ये हे गाणं वाजतय, प्रेक्षक डान्स करताना दिसत आहेत. अशातच आता प्रेक्षकांना हे गाणं लाईव्ह सुद्धा ऐकायला मिळालं. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे ह्यांनी हे गाणं गायलं आहे आणि नुकतच त्यांनी प्रेक्षकांचं लाईव्ह मनोरंजन केलं आणि त्यांना प्रचंड चांगला प्रतिसाद मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आपल्या चाहत्यांसाठी त्यांनी वेग वेगळ्या ठिकाणी परफॉर्म केलं. हे गाणं नक्कीच प्रेक्षकांना वेड लावत आहे हे आनंद शिंदे ह्यांनी पटवून दिलय. इतकच नव्हे तर ह्या गाण्यानी २.५ मिलियन व्ह्यूजचा आकडा पार केलाय.

गावरान भाषा आणि लोकसंगीताची छाप या गाण्यात पहायला मिळते. या गाण्याला ओंकारस्वरूप ह्यांनी संगीत दिलं आहे. तर सुहास मुंडे यांचे शब्द आहेत. 'चित्रपटाची निर्मिती स्वतः शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे. २३ मे २०२५ ला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

## 'प्राण'च्या अध्यक्षपदी राज तलरेजा, सचिवपदी नितीन कोतकर यांनी स्वीकारला पदभार

**नाशिक ।** उंटवाडी रोड येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स येथील अशोका व्हर्चू हॉल येथे प्रोफेशनल रिअल्टर्स असोसिएशन ऑफ नाशिक (प्राण) संस्थेच्या कार्यकारणी पदाधिकारी निवडीची प्रक्रिया झाली. यावेळी २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी नूतन अध्यक्ष आणि कार्यकारिणीची स्थापना समारंभपूर्वक निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी राज तलरेजा यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. तर सचिवपदी नितीन कोतकर यांनी जबाबदारी स्वीकारली.

या पदाधिकाऱ्यांसह नूतन कार्यकारिणीने देखील आपल्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या. समारंभाची सुरुवात मावळते अध्यक्ष विक्रांत आव्हाड यांच्या सादरीकरणाने झाली. यावेळी त्यांनी आपल्या तीन वर्षांच्या (२०२२-२०२५) यशस्वी कार्यकाळातील ठळक घडामोडी व उपक्रमांचा आढावा मांडला. त्यांच्या नेतृत्वाखाली प्राणच्या सदस्यसंख्येत मोठे वाढ झाली ३० संस्थापक सदस्यांपासून सुरु होऊन २२० सदस्यांपर्यंत संघटन पोहोचले. या काळात प्राणने २४ नॉलेज फोरम्स सत्रांचे आयोजन, मासिक बिझनेस नेटवर्किंग मीट्स आणि अनेक साइट व्हिजिट्स यशस्वीरित्या आयोजित केल्या. तसेच ७/१२ रियल्टर्स डेनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले. विक्रांत आव्हाड यांनी त्यांच्या संपूर्ण कार्यकारी टीमचे आभार मानले.




संघभावनेमुळेच हे यश शक्य झाल्याचे नमूद केले. हे सादरीकरण सचिव नितीन कोतकर यांच्या सहकार्याने झाले.

यानंतर नवनियुक्त अध्यक्ष राज तलरेजा यांनी आपल्या भावी योजनांची आणि दृष्टिकोनाची माहिती दिली. प्राणला आणखी उंचीवर नेण्याच्या संकल्पाने ते पुढे वाटचाल करणार असल्याची ग्वाही दिली. त्यांनी आपल्या ऊर्जावान टीमसह नव्या पर्वाची सुरुवात करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष गौरवभाई ठाक्कर, सचिव तुषार संकलेचा ,राजन दर्यानी,सी.ए. प्रफुल बरडिया, प्रेम कारडा,समीर देसाई त्यांनी नव्याने निवड झालेल्या कार्यकारिणीस शुभेच्छा दिल्या व सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन दिले. समारंभात प्राणमधील महिला रिअल्टर्सचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या रिअल इस्टेट क्षेत्रातील योगदानाबद्दल गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन देवरे व यश शाह यांनी केले. तर सचिव नितीन कोतकर यांनी आभार मानले. हा समारंभ प्राणच्या व्यावसायिक, ज्ञानाधिष्ठित आणि एकजुटीच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरला.कार्यक्रमास प्राण सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अशी आहे नवीन कार्यकारिणी

अध्यक्ष- राज तलरेजा, आय पी पी- विक्रांत आव्हाड,सचिव- नितीन कोतकर, उपाध्यक्षः प्रदीप रणधीर, सह-सचिवः गिरीश विजन, कोषाध्यक्षः नितीन जांगडा, सह.कोषाध्यक्षः अमित वाघ, सल्लागारः राजेंद्र कोतकर, डी. जे.धामणे, कैलास कदम. कार्यकारणी सदस्यः श्रीरंग भदाणे, श्रीकांत पाटेकर, प्रशांत नहार, रवी सुर्यवंशी, जगदीश बंग, यश शाह, संजय दुसे, पवन राठी, योगेश नेरकर. आमंत्रित सदस्यः क्षितिज दंडगव्हाळ, निलेश येवले, मनीष शाह, प्रियांका तलरेजा, भावेश सचदेव, बादल अग्रवाल.

## शेतकऱ्यांच्या हितासह ठेवीदारांना दिलासा देण्याचा प्रयत्न : कृषिमंत्री

### शेतकरी कर्जमाफी संदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा करून निर्णय घेण्याचे सूतोवाच

**नाशिक ।** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आम्ही दिलेल्या वचनाप्रमाणे कर्जमाफी करणार आहोत. लवकरच या संदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. तसेच नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेसंदर्भात शेतकऱ्यांच्या हितावह निर्णय घेण्यासह ठेवीदारांनाही दिलासा देण्यात येईल, असे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी स्पष्ट केले.

मुंबई येथील मंत्रालयात सातव्या मजल्यावरील समिती कक्ष क्रमांक पाचमध्ये झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना व शेतकरी प्रतिनिधींना आश्वासित करताना ते बोलत होते. या बैठकीसाठी अन्न व प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, माजी आमदार व प्रहार जनशक्तीचे अध्यक्ष बच्चू कडू, शेतकरी संघटनेचे ललित बाहळे, शेतकरी समन्वय समितीचे अध्यक्ष भगवान बोराडे, शेतकरी संघटनेचे अर्जुन बोराडे, 938 आदिवासी विविध कार्यकारी सहकारी सहकारी संस्थेचे राज्य अध्यक्ष कैलास बोरसे, शेतकरी नेते प्रकाश शिंदे, विलास बोरस्ते, वकील जावळे, चिंधू पगार, दिलीप पाटील, सुभाष पवार, रमेश बोरस्ते, बाळासाहेब बोरस्ते, बाळासाहेब सुखदेव बोरस्ते, संजय मालकर, सुरेश परब, यांच्यासह सहकार खात्याचे उपसचिव संतोष पाटील, कृषी खात्याचे अधिकारी व इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी बैठकीस उपस्थित होते.

नाशिक येथे नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सक्तीच्या कर्ज वसुली विरोधात तसेच संपूर्ण कर्जमाफी या मागणीसाठी एक जून २०२३ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन ६८७ दिवसांपासून सुरू आहे. या संदर्भात नाशिक येथे नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर सहकार, उपसचिव संतोष पाटील व जिल्हा बँकेच्या प्रशासक समवेत जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये शेतकरी प्रतिनिधींच्या समवेत ११ एप्रिल रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये शेतकऱ्यांनी आमचे संपूर्ण कर्ज माफ व्हावे नाहीतर आमच्या कर्जावरील संपूर्ण व्याज माफ करून दहा वर्षासाठी मुद्दलावर व्याज न घेता समानता दहा वर्षासाठी करावे, अशा पद्धतीचे मागणी करण्यात आली होती.

या बैठकीनंतर नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी समवेत व राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, जिल्हाधिकारी जलाल शर्मा यांच्या समवेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या हॉलमध्ये बैठक करण्यात आली होती. यानंतर प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांनी मशाल मोर्चा कृषिमंत्री माणिक कोकाटे



यांच्या निवासस्थानी नेला होता. या मोर्चाला मोबाईलवरून माणिक कोकाटे यांनी मी १७ तारखेला मुंबई येथे शेतकरी संघटनेचे नाशिक जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांसमोर व आपल्या समवेत आणि मंत्रालय सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांसमोर बैठक घेणार असून, या बैठकीमध्ये सन्माननीय तोडगा काढण्यात येईल, असे सांगितले होते. त्यानुसार मुंबई येथे मंत्रालयात कृषिमंत्री कोकाटे यांनी बैठक आयोजित केली होती. या बैठकीमध्ये बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीसह शेती ही रोजगार हमी योजनेअंतर्गत करून या शेतकऱ्यांना दिलासा देण्यात यावा तसेच इतर बाबतीतही शेतकऱ्यांना दिलासा देण्यात यावा व विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आपण शेतकऱ्यांना शेती कर्ज माफ करण्याचे आश्वासन दिले होते त्यानुसार शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे, अशी जोरदार मागणी कोकाटे यांच्याकडे केली. यावेळी शेतकऱ्यांसंदर्भात अनेक महत्त्वाच्या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी माणिक कोकाटे यांनी शेतकऱ्यांची एक समिती नेमून या समितीस मी दिल्ली येथे सहकारमंत्री, कृषिमंत्री, पणनमंत्री यांच्या समवेत बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात चर्चा करण्यात येईल. त्यासाठी लवकरच एक समिती महाराष्ट्रात गठीत करून या समितीत अभ्यास करून शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल व शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नांसाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्यासह इतर मंत्र्यांसमोर सकारात्मक चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. यावेळी महाराष्ट्र राज्यातील ९३८ आदिवासी सहकारी संस्थेच्या कर्जमाफीसाठी आदिवासी विकास मंत्र्यांसमवेत लवकरच चर्चा करण्यात येईल व व आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्याशी दूरध्वनी वरून संपर्क साधण्यात येऊन आदिवासी सोसायटीची महाराष्ट्रातील थकबाकीदार शेतकऱ्यांचे कर्ज माफीसाठी आपल्याला निर्णय घ्यावा लागेलं, असे सांगितले असता आदिवासी विकासमंत्र्यांनी लवकर या संदर्भात आपण बैठक घेऊन कर्जमाफीचा निर्णय घेऊ असे सांगितले. ना. झिरवळ यांनी उपस्थितांना या बैठकीत सांगितले.

## महत्त्वाचे

### सेपक टकरा जिल्हा निवड चाचणीचे २० एप्रिलला आयोजन

**नाशिक ।** सेपक टकरा असोसिएशन ऑफ नाशिकच्या वतीने रविवार दिनांक २० एप्रिल रोजी सब ज्युनियर ( १७ वर्षे आतील) गटाच्या जिल्हा निवड चाचाचणीचे आयोजन स्वर्गीय मीनाताई




ठाकरे विभागीय क्रीडा संकुल येथे करण्यात आले आहे. दिनांक २० एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता निवड चाचणीला प्रारंभ होईल. या निवड चाचणीतून उत्कृष्ट खेळाडूंची जिल्हा संघामध्ये निवड करण्यात येणार आहे. हे निवड झालेले खेळाडू दिनांक २२ आणि २३ एप्रिल २०२५ दरम्यान नागपूर येथे महाराष्ट्र राज्य सेपक टकरा असोसिएशनच्या वतीने आयोजित राज्य निवड चाचणीमध्ये सहभागी होतील. दिनांक ११ ते १५ मे २०२५ दरम्यान पटना-बिहार येथे १७ वर्षे वर्ष आतील (मुले-मुली) खेलो इंडिया युथ गेम्सचे आयोजन करण्यात येणार आहे. या जिल्हा निवड चाचणीमध्ये नाशिक जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे असे आवहान सेपक टकरा असोसिएशन ऑफ नाशिकचे मार्गदर्शक श्री अशोक दुधारे, अध्यक्ष चंद्रकांत बनकर, कार्याध्यक्ष आनंद खरे जिल्हा असोसिएशनचे सरचिटणीस दीपक निकम यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी अमोल राठोड मो. ९३५६०९४९५३, आनंद चकोर मो. ९७६४१०६५६० प्रवीण घोगरे मो. ९६०४९४५८५८ अमोल आहेर, शैलेश रकीबे, भूषण सोनीस यांच्याशी संपर्क साधावा.

### आदिवासी विकास विभागांतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण

**नाशिक ।** शबरी आदिवसी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासी विकास विभागांतर्गत रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण राबविण्यात येत आहे. त्यानुसार इच्छुक प्रशिक्षणार्थींनी शबरी महामंडळामार्फत एकलव्य कुशल http//eklavyakushal.in या बेवपोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिकचे प्रकल्प अधिकारी अर्पित चौहान यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी 20 प्रशिक्षण संस्थांची निवड केली असून त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात सद्यंस्थितीत 45 प्रशिक्षण केंद्रांवर निवासी/ अनिवासी स्वरूपाचे विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जात आहेत. या योजनेंतर्गत 18 ते 45 वर्षे वयोगटातील 13 हजार 800 अनुसूचित जमातीच्या युवक-युवतींना विविध रोजगाराभिमुख कौशल्य प्रदान करून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याबाबत अधिक माहितीसाठी शबरी महामंडळामार्फत टोल फ्री क्रमांक 18002335860 हा उपलब्ध करून देण्यात आला आहे, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### ‘अशी ही जमवा जमवी’ची धडाकेबाज कमाई

**नाशिक ।** मराठी चित्रपटसृष्टीतील बहुप्रतिक्षित कौटुंबिक विनोदी चित्रपट "अशी ही



जमवा जमवी" ने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत, आपल्या प्रदर्शनाच्या पहिल्याच आठवड्यात चांगली कमाई केली आहे. प्रदर्शित झाल्यापासून केवळ सात दिवसांतच या चित्रपटाने कोटींची भरघोस कमाई केली आहे. शहरी भागांबरोबरच ग्रामीण भागातही प्रेक्षक मोठ्या संख्येने चित्रपटगृहात हा सिनेमा पहायला गर्दी करत आहेत. चित्रपटाची कथा, कलाकारांचा उत्कृष्ट अभिनय आणि दिग्दर्शकाची प्रभावी मांडणी यामुळे चित्रपटाला प्रेक्षकांचा आणि समीक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. मराठी चित्रपटसृष्टीत नवा उत्साह निर्माण करत, या बहुप्रतीक्षित चित्रपटाने दणदणीत यश मिळवलं आहे. तरुण वर्गासोबतच सर्व वयोगटांमध्ये हा सिनेमा गाजतोय. दिग्गज अभिनेते अशोक सराफ आणि वंदना गुप्ते सोबत ओमकार कुलकर्णी, तनिष्का विशे, सुनील बर्वे, चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर अशा लोकप्रिय कलाकारांची फौज या सिनेमात आहे. हा चित्रपट राजकमल एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली प्रदर्शित झाला असून, व्ही. शांताराम यांचे नातू राहुल शांताराम यांचे हे पहिले निर्मिती आहे. राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते दिग्दर्शित हा सिनेमा १० एप्रिल पासून चित्रपटगृहात धुमाकूळ घालत प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे.

# पाणीटंचाईच्या झळा अन् अपव्ययाचं दुर्दैवी चित्र

## नागरिक त्रस्त; जबाबदारांवर कारवाई होणार का?



**सिडको ।** उन्हाळ्याच्या कडाक्यामुळे संपूर्ण नाशिककरांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत असताना, सिडको परिसरातील बडदे नगर येथे मुख्य पाईपलाईन फुटल्यामुळे हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात असल्याचं दुर्दैवी दृश्य शनिवारी सकाळपासून पाहायला मिळालं. दुसरीकडे, अनेक वसाहतींमध्ये नळाला पाणी येणं बंद झालं असून, येत असलेल्या पाण्याचा दाब अतिशय कमी आहे. यामुळे संतप्त नागरिकांनी विभागीय कार्यालयावर हंडा मोर्चा नेण्याचा इशारा दिला आहे.

> या पाणी अपव्ययाला जबाबदार असलेले अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर महापालिका आयुक्त कारवाई करावी. प्रशासनाने याची तत्काळ दखल घेऊन तातडीने दोषींवर कारवाई करावी आणि जलवाहिनीच्या देखभाल व्यवस्थेत सुधारणा करावी. अन्यथा नागरिकांचं रोष मोठ्या आंदोलनात रूपांतरित होणार, हे निश्चित. **- अंकुश वराडे, सामाजिक कार्यकर्ते**

बडदे नगर भागात फुटलेल्या मुख्य जलवाहिनीमुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो आहे. नागरिकांनी अनेकदा पालिका आणि जलपुरवठा विभागाकडे तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप करत, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. सिडकोसह आसपासच्या भागांमध्ये गेल्या काही आठवड्यांपासूनच पाणीपुरवठा अडचणीत आला आहे. काही भागांमध्ये दर दोन ते तीन दिवसांनी पाणी येतं, तर काही ठिकाणी तेही मिळत नाही. पाणी मिळालं तरी अत्यंत कमी दाबाने येत असल्यामुळे नागरिकांना भर उन्हाळ्यात नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याच दरम्यान, जलपुरवठा विभागाकडून जाहीर करण्यात आलं की, पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल. मात्र दुसरीकडे प्रशासनाच्याच हलगर्जीमुळे लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचं प्रत्यक्ष चित्र नागरिक पाहत आहेत. त्यामुळे पाणी वाचवण्याची जबाबदारी केवळ नागरिकांवर टाकून प्रशासन स्वतःच्या जबाबदाऱ्यांपासून पळ काढतो आहे, अशी भावना व्यक्त होत आहे.

पाणीपुरवठा यंत्रणेतील अकार्यक्षमता, देखभालीतील हलगर्जीपणा आणि वेळेवर दुरुस्ती न होणं यामुळेच अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

# बस कर्मचाऱ्यांवरील निलंबन अखेर रद्द

## भाजपा कामगार मोर्चाच्या हस्तक्षेपाला यश



**सिडको । कर्मचाऱ्यांचे निलंबन स्थगित झाल्यानंतर आनंद उत्सव साजरा करताना जिल्हाध्यक्ष राहुल आरोटे यांच्यासह इतर कर्मचारी**

**सिडको ।** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागातील बस सेवेमधील कर्मचारी राजेंद्र पाठक आणि वैभव कांबळे यांच्यावर करण्यात आलेली एकतर्फी निलंबनाची कारवाई अखेर रद्द करण्यात आली. ही कारवाई अन्यायकारक आणि सूडबुद्धीने करण्यात आल्याचा आरोप होत असल्याने, संबंधित प्रकरणाची गंभीर दखल घेत भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप केला.

या संपूर्ण आंदोलनामध्ये भारतीय जनता पार्टी नाशिक शहराचे अध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा कामगार मोर्चाचे उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस व्यंकटेशजी मोरे, जिल्हाध्यक्ष राहुल आरोटे, शहराध्यक्ष हेमंत नेहेते व इतर पदाधिकारी सक्रिय होते. त्यांच्या प्रयत्नामुळेच हा सकारात्मक निर्णय शक्य झाला. सदर प्रकरणी वाहतूक नियंत्रक श्री. सोनवणे यांच्याशी परिवहन महामंडळाच्या कार्यालयात शनिवारी बैठक घेण्यात आली. या बैठकीत भाजपा कामगार मोर्चाचे पदाधिकारी, सेवाशक्ती कामगार युनियनचे प्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. दोन्ही कर्मचाऱ्यांचे निलंबन अन्यायकारक असून ते तात्काळ मागे घ्यावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली. चर्चेअंती संबंधित अधिकाऱ्यांनी निलंबन रद्द करण्याचा निर्णय घेतला. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या सूडबुद्धीने होणाऱ्या कारवाया रोखण्यासाठी खबरदारी घेतली जाईल, अशी लेखी शाश्वती देण्यात आली. वरील निर्णयानंतर सेवाशक्ती कामगार युनियनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि कर्मचारीवर्गाने भाजपा कामगार मोर्चाचे आभार मानले. कार्यालय परिसरात ‘जय भाजपा कामगार मोर्चा’च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.

> हा निर्णय कामगार हक्कांचे रक्षण करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. इतिहासात प्रथमच अशा प्रकारचे निलंबन रद्द करण्यात आले आहे. याचा आम्हाला आनंद आहे. भविष्यात अशा अन्यायकारक कारवाया होऊ नयेत यासाठी कामगार संघटनांकडून सजग पाऊले उचलली जातील.
> **- राहुल आरोटे, जिल्हाध्यक्ष, भाजपा कामगार मोर्चा**



# नाशिकच्या नलिनी कड यांची 'काला पत्थर'वर यशस्वी चढाई

**नाशिक ।** येथील धाडसी महिला नलिनी कड यांनी एव्हरेस्ट बेस कॅम्प सर केल्यानंतर काल ' काला पत्थर ' वर यशस्वी चढाई केली. थांगू घाटीतून अतिशय खडतर मार्गाने त्यांनी हे आव्हान पेलले. उणे १८ तापमानात येथे पोहोचल्यावर माउंट एव्हरेस्ट, चांगत्से व नुप्त्से व इतर शिखरांच्या झालेल्या अद्भुत दर्शनाने साऱ्या श्रमांचा विसर पडला. जीवनाचे सार्थक झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

नेपाळ व सिक्किम जवळच्या लाचेन येथून नलिनी कड यांनी मध्यरात्री थोडे दिसायला लागताच चालण्यास प्रारंभ केला. पुमोरी, गोरेक्षेप मार्गाने ही खडतर वाट त्यांनी जिद्दीने सहजपणे पार केली. आपला अनुभव प्रस्तुत प्रतिनिधीला सांगताना त्यांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. त्या हर्षभरीत होऊन म्हणाल्या, ज्याक्षणी 'काला पत्थर ' येथे पहिले पाऊल ठेवले तेव्हा आपल्या देशाचे, राज्याचे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे माझ्या नाशिकचे नाव रोशन करण्याची संधी मिळाल्याचे मला समाधान झाले.



समुद्रसपाटीपासून १५५०० फूट म्हणजेच ५५५५ मीटर वरील 'काला पत्थर ' हे स्थान ट्रेकर्समध्ये अतिशय लोकप्रिय आहे. येथून सुर्योदय व सुर्यास्ताचे अत्यंत विलोभनीय दृश्य दिसते. वर्षभर बर्फाच्छादित असणाऱ्या या परिसरात मार्च ते जून कमी प्रमाणात बर्फ पडत असल्याने या कालावधीत धाडसी ट्रेकर्स येथे चढाई करतात. एक छोटा तलाव व लष्करी हेलिपॅड येथे आहे. दुपारच्या वेळात अत्यंत वेगाने वादळी वारे वाहतात. त्यामुळे लवकरच परतीची वाट धरली. योग साधना, नियमित व्यायाम, सायकलींग, थोरामोठ्यांचे आशीर्वाद आणि सर्वांच्या शुभेच्छा यामुळेच हे सर्व शक्य झाल्याचे त्यांनी विनम्रपणे सांगितले.

# एलजी अल्ट्रा कंपनीच्या नव्या कुकरने जेवण बनेल अधिक रुचकर

## नाशिकच्या मुख्य दुकानांमध्ये उत्पादन उपलब्ध, अधिक प्रभावी स्वयंपाक शक्य

**नाशिक ।** स्वयंपाक करताना ‘कुकर’च्या नेमक्या किती शिट्या झाल्या हे आपल्याला अचुकपणे सांगणे जास्तच अवघड जाते. पण आता ‘शिट्यांची’ काळजी करण्याचे काहीच कारण नाही. एलजी अल्ट्रा कंपनीने नवीन कुकर बाजारात आणला असून त्यातून एकूण किती शिट्या झाल्या हे आपल्याला अगदी सहजपणे कळणार आहे. त्यामुळे अंदाजे होणारा स्वयंपाक आता यापुढे एकदम खात्रीशिर होण्यास मदत मिळणार असल्याची माहिती एलजी अल्ट्रा कंपनीचे विपणन व विक्री विभागाचे प्रमुख पार्थ सारथी व महाराष्ट्र-गुजरातचे व्यवसाय विकास व्यवस्थापक कमलेश बंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. हे उत्पादन नाशिकच्या मुख्य दुकानांमध्ये उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.




प्रिमियम किचन उपकरणांमध्ये समाविष्ट एलजी अल्ट्रा कंपनीने घरगुती वापरातील नवीन उत्पादने बाजारात आणली आहेत. यात ट्रायप्लाय क्रोनो व्हिसल काऊंटिंग प्रेशर कुकरचा समावेश आहे. तीन थरांचे स्टेनलेस स्टिल वापरलेला हा प्रेशर कुकर बनविण्यासाठी कंपनीने सात वर्षे मेहनत घेतली. पूर्ण चाचणी झाल्यानंतर हा कुकर बाजारात विक्रीसाठी आणला आहे. स्टेनलेस स्टिलपासून तयार केलेला हा कुकर दीड, दोन, तीन, साडेतीन, साडेचार व साडेपाच लिटर क्षमतेचा आहे. यात एकूण ९ शिट्या मोजण्याची सुविधा कंपनीने उपलब्ध करुन दिली आहे. कुकरचे झाकण हे बाहेरील बाजूने बंद होत असल्याने आतमधे दाळीचे भांडे किंवा तत्सम अन्न शिजविण्याची सुविधा उपलब्ध आहे. स्टेनलेस स्टिलपासून बनलेला हा कुकर एलजी कंपनीने स्वत: तयार केला आहे. ‘मेड इन इंडिया’ असलेल्या या कुकरचे पेटंट भारतात फक्त ‘एलजी अल्टा’ कंपनीकडेच असल्याची माहिती कमलेश बंडे यांनी दिली. यावेळी पुणे विभागाचे सेल्स मॅनेजर योगेश खरात, नाशिकचे मुख्य वितरक संजय धोका उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांमध्ये रुजावा वैज्ञानिक दृष्टिकोन : ॲड. ठाकरे

## ‘तारांगण : अंतराळाची सफर’ उपक्रमाची मविप्र होरायझन अकॅडमीमध्ये सुरुवात

**नाशिक ।** विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी आणि त्यांना विश्वाच्या अद्भुततेची ओळख करून देण्यासाठी मविप्र माजी विद्यार्थी संघटनेने पोलाद स्टीलच्या मोबाईल प्लॅनेटेरियमच्या सहकार्याने ‘तारांगण : अंतराळाची सफर’ या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ केला आहे. या कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन नाशिकमधील गंगापूर रोडवरील मविप्रच्या होरायझन ॲकॅडमी सीबीएसई येथे उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे होते. या उपक्रमाच्या शुभारंभाच्या वेळी बोलताना ॲड. नितीन ठाकरे यांनी आजच्या वेगवान जगात विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्याच्या महत्त्वावर जोर दिला. त्यांनी मविप्र माजी विद्यार्थी संघटना आणि पोलाद स्टील यांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली, ज्यांनी मविप्रच्या विद्यार्थ्यांना ही अनोखी शैक्षणिक संधी उपलब्ध करून दिली. इतर मान्यवरांनीही या` कार्यक्रमाच्या क्षमतेवर विश्वास व्यक्त केला आणि हा उपक्रम भावी पिढीतील शास्त्रज्ञ आणि संशोधक घडवण्यासाठी महत्त्वाचा ठरेल, असे मत व्यक्त केले. मविप्र माजी विद्यार्थी संघटनेचा हा उपक्रम मविप्रच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना अंतराळाबद्दल माहिती आणि त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचा एक प्रयत्न आहे. या अनोख्या आणि संवादपूर्ण अनुभवातून विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञान आणि खगोलशास्त्र विषयी आवड निर्माण होईल, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.




हा उपक्रम विद्यार्थ्यांना एक आकर्षक आणि प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे फिरते तारांगण (इनफ्लॅटेबल डोम प्लॅनेटेरियम). एका सत्रात सुमारे ३० विद्यार्थी या तारांगणात विश्वाचा अनुभव घेऊ शकतील. प्रत्येकी ३० मिनिटांच्या सत्रात विद्यार्थ्यांना ग्रह, तारे, सौरमंडल आणि विशाल विश्वाची माहिती मनोरंजक पद्धतीने दिली जाईल. या उपक्रमामध्ये इस्रोच्या चांद्रयान मोहिमेसारख्या आधुनिक विषयांचाही समावेश असेल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञान आणि संबंधित क्षेत्रांबद्दल अधिक माहिती मिळेल आणि प्रेरणा मिळेल. याप्रसंगी इगतपुरी तालुका संचालक ॲड. संदीप गुळवे, नाशिक शहर संचालक ॲड. लक्ष्मण फकिरा लांडगे, शिक्षणाधिकारी डॉ. कैलास शिंदे, होरायझन ॲकॅडमी सीबीएसईच्या प्राचार्या ज्योती सामंता आदी उपस्थित होते.

# व्यापारयुध्दाचे नवे वळण

**परामर्श**

**हेमंत देसाई**, ज्येष्ठ पत्रकार



अमेरिकेतील स्थानिक जनतेच्या विरोधामुळे शुल्कवाढ रद्द करण्याचे शहाणपण ट्रम्प यांना सुचले असले तरी व्यापारयुद्ध संपलेले नाही. अमेरिकेतील अनेक कंपन्या चीनमध्ये माल बनवत असल्यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती कमी होते; त्याचा फायदा फक्त चीनला होतो, असे ट्रम्प यांचे मत आहे. या आणि अमेरिकेवर लादलेल्या आयात शुल्काच्या मुद्दयावर त्यांनी आरंभलेले व्यापारयुध्द आता कोणते वळण घेणार, हे पहायचे.

अमेरिकेने बहुतांश देशांवरील आयात शुल्क तीन महिन्यांसाठी थांबवले असून, त्यामध्ये भारताचाही समावेश आहे. जवळजवळ सर्व देशांच्या आयातीवर दहा टक्के शुल्क कायम असेल. परंतु त्या पलीकडील वाढीव कर घेणे मात्र स्थगित करण्यात आले आहे. यामुळे शेअर बाजारात आलेले निराशेचे मळभ ताबडतोब दूर झाले आहे. परंतु चिनी आयातीवरील करदर अमेरिकेने १२५ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. तत्पूर्वी अमेरिकेने चीनवर १०४ टक्के समतुल्य आयातकर लावला होता. त्याला उत्तर म्हणून चीनने अमेरिकेवर ८४ टक्के कर लावला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर आधी ३४% आयातकर लावल्यानंतर चीनने तेवढाच कर लावला! हा कर मागे न घेतल्यास चीनवर ५० टक्के अतिरिक्त आयात कर लावण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला होता. त्यानुसार १०४ टक्के इतका आयात कर आकारला. त्यानंतर हा कर १२५ टक्के करण्यात आला. थोडक्यात, जागतिकीकरणाची चक्रे उलटी फिरवण्याचे ट्रम्प यांनी स्पष्ट केले असून, त्या विरोधात चीन जागतिक व्यापार संघटनेत जाणार आहे. तेथे त्यांनी अगोदरच अमेरिकेच्या विरोधात एक खटलादेखील दाखल केला आहे. अमेरिकेतील स्थानिक जनतेच्या विरोधामुळे ट्रम्पना शहाणपण सुचले असले, तरी व्यापारयुद्ध संपले आहे, असे म्हणता येणार नाही. आपल्या पहिल्या कार्यकाळातही त्यांनी चीनविरोधात अशीच आघाडी उघडली होती. चीन आणि अमेरिका या जगातील मोठ्या अर्थव्यवस्था आहेत. अमेरिकेतील अनेक कंपन्या चीनमध्ये माल बनवतात. त्यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती कमी होते, त्याचा फायदा फक्त चीनला होतो, असे ट्रम्प यांचे मत आहे. त्यातूनच ताजे व्यापारयुध्द सुरु झाले.

चीन असो वा अन्य देश, त्यांनी अमेरिकेत गुंतवणूक करावी, मोठमोठे कारखाने आणि प्रकल्प उभारावेत आणि स्थानिक अमेरिकनांना नोकऱ्या द्याव्यात, असे ट्रम्प यांचे मत आहे. परंतु जागतिकीकरणाच्या अगोदरच्या टप्प्यात अनेक देशांमध्ये हाच विचार प्रचलित होता. साम्यवादी देशांमध्ये तसेच भारतासारख्या देशातही नियंत्रित आणि अनेक बंधने असलेली अर्थव्यवस्था होती. त्यामुळे काय घडले हा इतिहास सर्वज्ञात आहे. साम्यवादी, समाजवादी अथवा मिश्र अर्थव्यवस्था असलेल्या देशांमध्ये सरकारी आणि खाजगी उद्योग कार्यक्षमतेने चालवले गेले नाहीत. उत्पादनक्षमतेचा विस्तार करणे, नवीन क्षेत्रात पदार्पण करणे यावर अनेक बंधने होती. त्याचप्रमाणे आयात-निर्यात व्यापारावर निर्बंध होते. त्यामुळे स्पर्धा कमी झाली आणि अनेक ठिकाणी स्वदेशीच्या नावाखाली केवळ त्या त्या उद्योगांचे लाड पुरवले गेले. देशांतर्गत स्पर्धा कमी आणि विदेशी मालआयातीवर बंधने यामुळे स्थानिक उद्योगपतींनी ग्राहकांची अक्षरशः लूट सुरू केली. भिकार आणि महागडा माल लोकांच्या गळ्यात मारला गेला. अनेक सरकारी व खाजगी सेवांचा दर्जा सुमार होता. सरकारने वर्षं वर्ष कर्मचाऱ्यांची अनेक पदे भरली नाहीत, हेही एक महत्त्वाचे कारण होते. नवनवीन उत्पादने आणणे, वेगळे प्रयोग करणे, मालाची गुणवत्ता सुधारणे आणि किंमत कमी करणे ही प्रक्रियाच मंदावत गेली. आता ट्रम्प यांना 'आत्मनिर्भर अमेरिके'च्या नावाखाली पुन्हा हाच कित्ता गिरवायचा असेल, तर अमेरिकेला कोणीही वाचू शकणार नाही!

एकेकाळी जागतिक व्यापार करारावर भारताने स्वाक्षरी करावी, यासाठी युरोप तसेच अमेरिकेसारखे देश, त्याचप्रमाणे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आग्रही होत्या. आज तीच अमेरिका उघड उघडपणे जागतिकीकरणविरोधी, आर्थिक संरक्षकवाद आणत आहे, तेव्हा भारतासह अनेक देश दिग्मूढ झाले आहेत. अमेरिकन जनतेने रस्त्यावर येऊन ट्रम्प यांना तळ्यावर आणले. परंतु १९९० च्या दशकात सर्व श्रीमंत देश ज्याप्रकारे अमेरिकेच्या मागे उभे होते, तसे चित्र आज नाही. परंतु चीन वगळता अन्य देश अमेरिकेविरोधात तेवढे आक्रमक नाहीत, हेदेखील तितकेच खरे.

दुसरे महायुद्ध १९३९ ते १९४५ दरम्यान झाले. महायुद्ध संपत आले, तोपर्यंत जगात मंदी आली होती. त्यातून वाट काढण्यासाठी १९४४ मध्ये ब्रेटनवूड्स येथे एक परिषद झाली आणि १९४७ मध्ये जगातील २३ देशांनी जनरल अॅग्रीमेंट ऑन ट्रेड अँड टॅरिफ, म्हणजेच गॅट करार केला. जागतिक व्यापार नीट चालवावा आणि वेगवेगळ्या देशांनी आयात-निर्यातीवरील निर्बंध सैल करावेत, हा त्यामागील उद्देश होता. पहिल्या करारात ४५ हजार वस्तूंवरील आयात शुल्कात कपात करण्यात आली. त्यामुळे जागतिक व्यापार वाढला. १९४७ नंतर १९७३ पर्यंत झालेल्या प्रत्येक करारात (एकूण सात) आयात शुल्क घटवण्याबद्दलच चर्चा झाली आणि तशी पावले टाकण्यात आली. १९७३ नंतर तेरा वर्षे वाटाघाटीच्या फेऱ्या झाल्याच नाहीत. आठवी फेरी १९८६ मध्ये उरुग्वेमध्ये सुरू झाली. या फेरीत प्रथमच शेती, सेवा, गुंतवणूक आणि पेटंट्स, कॉपीराइट्स वगैरे बौद्धिक संपदा अधिकार या चार नवीन विषयांचा कराराच्या वाटाघाटीत समावेश करण्यात आला.

उरुग्वेची चर्चेची फेरी १९९१ पर्यंत चालली आणि मग डंकेल ड्राफ्ट या नावाने कराराचा एक मसुदा सर्वांसमोर ठेवण्यात आला. त्यावर भरपूर चर्चा झाली. डंकेल प्रस्ताव स्वीकारू नये म्हणून भारतात मुख्यतः डाव्यांनी जोरदार विरोध केला. मोर्चे, परिषदा, चर्चासत्र झाली. परंतु अखेर मोरोक्कोच्या मारकेश येथील परिषदेत १५ एप्रिल १९९४ रोजी सव्वाशे देशांनी या करारावर पसंतीची मोहोर उमटवली. त्यानंतर डब्ल्यूटीओ किंवा वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन ही संस्था स्थापन झाली. एक जानेवारी १९९५ पासून नवीन जागतिक व्यापार कराराची अंमलबजावणी सुरू झाली. भारत गॅटमध्ये असल्यामुळे डब्ल्यूटीओच्या स्थापनेतही भारताची ठळक भूमिका होतीच. डब्ल्यूटीओमुळे देशोदेशीच्या व्यापारातील वेगवेगळे अडथळे बाद करण्यात आले. काही एक नियमावली आखून व्यापार सुरू झाला आणि मग सदस्य संख्या १६० पर्यंत पोहोचली. तोपर्यंत भारतासारख्या अनेक देशांमध्ये आर्थिक शिथिलीकरणाची प्रक्रिया सुरू झाली होती. भारतात यूपीएप्रमाणेच एनडीए सरकारनेदेखील उदारीकरणाचा रस्ता कायम ठेवला. एवढेच काय, देवेगौडा आणि गुजराल यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त आघाडी सरकारनेही हा रस्ता बदलला नाही. एकमेकांशी व्यापार करण्यासाठी द्विपक्षीय करार करण्याऐवजी एकाच वेळी अनेक देशांशी जागतिक व्यापार कराराच्या माध्यमातूनच संलग्न होणे शक्य झाले. त्यामुळे भारतात, खास करून पायाभूत सुविधांसाठी लागणारे भांडवल मोठ्या प्रमाणात येऊ लागले. तंत्रज्ञान आले. अनेक भारतीय कंपन्यादेखील बहुराष्ट्रीय झाल्या. शेअर बाजार, बँकिंग, उत्पादन व सेवाक्षेत्र यांचा विकास झाला.



**देशभरात नवनवीन रस्ते, इमारती, धरणे, पूल उभे रहात असल्याने भारताची पेट्रोलियम उत्पादनांची मागणी वाढली असून आपल्याला ८८ टक्के कच्चे तेल आयात करावे लागत आहे. सत्तेवर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कच्च्या तेलाबाबत स्वयंपूर्णता प्राप्त करण्याच्या दिशेने झटण्याची घोषणा केली होती. प्रत्यक्षात भारताचे परावलंबित्व वाढतच चालले असून अर्थव्यवस्थेला अधिकाधिक फटका बसू लागला आहे.**

१९९९-२००० पासून, म्हणजे डब्ल्यूटीओच्या तिसऱ्या मंत्री परिषदेपासून अविकसित आणि विकसनशील देशांचे नेतृत्व भारताकडे आले. युरोप, अमेरिका, चीनसारख्या देशांनी लावलेल्या निर्बंधांविरोधात भारताने डब्ल्यूटीओच्या तंटानिवारण यंत्रणेकडे दाद मागितली आणि ती बंधने दूर करण्यास भाग पाडले. म्हणजे डब्ल्यूटीओचे फायदेही झाले. परंतु त्याचबरोबर देशातील एमएसएमई सेक्टर या जागतिक आव्हानापुढे टिकाव धरु शकला नव्हता. तसेच अर्थव्यवस्थेत मेगा कंपन्या आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी प्रस्थापित झाली. आर्थिक विषमता वाढली आणि पर्यावरणाची वाट लागली. विकासाच्या नावाखाली महाकाय प्रकल्प हाती घेताना, होणाऱ्या वनसंपत्तीच्या नाशाकडे दुर्लक्ष झाले. म्हणजे जागतिकीकरणाच्या फायद्याप्रमाणे तोटेदेखील झाले. २००१ मध्ये दोहा येथे 'डब्ल्यूटीओ'ची परिषद होऊन एक विकासाचा अजेंडा संमत करण्यात आला. परंतु अनेक वर्षे त्यावर कार्यवाहीच झाली नाही. गरीब आणि विकसित देशांनी आपल्या बाजारपेठा खुल्या कराव्यात म्हणून नेहमीच दबाव आणला जातो आणि स्वत: प्रगत देश मात्र आपल्या बाजारपेठा त्या प्रमाणात खुल्या करत नाहीत, असा अनुभव आहे. पर्यावरण, ई-कॉमर्स या विषयात डब्ल्यूटीओची भूमिका फारशी प्रभावी ठरलेली नाही. आता चीन, अमेरिका व्यापारयुद्ध तीव्र बनले असून योग्य पावले टाकल्यास भारताला या संधीचा फायदा उचलता येईल. मात्र यापूर्वी भारताने 'आत्मनिर्भर भारत'च्या नावाने नावाखाली असाच आर्थिक संरक्षणवाद जपला. मोदी समर्थक अर्थतज्ज्ञ अरविंद पानगरिया यांनीही त्याला वेळोवेळी विरोध केला. नरेंद्र मोदी यांचे मित्र डोनाल्ड ट्रम्प हे त्याच वाटेने चालू पाहत आहेत, याची नोंद घेतली पाहिजे.

# चोक्सीची भुरटेगिरी आणि भारताचा दावा

**नोंद**

**आरिफ शेख**

**भारतात हजारो कोटी रुपयांचा गंडा घालून परदेशात आश्रय घेतलेल्या मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये अटक झाली. त्यावरून लगेच प्रत्यार्पणाचा अंदाज बांधला जात असला, तरी याच प्रकरणातील सहआरोपी आणि मेहुलचा भाचा नीरव मोदी याचे प्रत्यार्पण होऊ शकलेले नाही. त्यामुळे त्याला भारतात आणणे तितकेसे सोपे नाही, याची जाणीव ठेवून कायदेशीर मार्ग अवलंबावे लागतील.**

विजय मल्ल्या, नीरव मोदी, ललित मोदी, मेहुल चोक्सी यांनी हजारो कोटी रुपयांना गंडा घालूनही त्यापैकी एकालाही भारतात आणण्यात गेल्या सात वर्षांमध्ये यश मिळालेले नाही. भारतात गंडा घालून देशी तपास यंत्रणांच्या नाकावर टिच्चून परदेशात पळून गेलेल्यांना परत आणणे किती अवघड आहे, हे आता तपास यंत्रणांना चांगलेच समजले असेल. नीरव, चोक्सी अशा लबाडांनी भारतात लाखो रुपयांना गंडा घातला आहे. त्यांच्याकडे कायदेशीर बाबींवर खर्च करण्यासाठी भरपूर संपत्ती असून जगातील नामवंत वकिलांची फौजही आहे. चोक्सीला बेल्जियममध्ये अटक झाल्यानंतर प्रत्यार्पणाला दोन मुख्य कारणांवर आव्हान दिले जाईल. पहिला मुद्दा राजकीय असून दुसरा प्रकृती ठिक नसल्याचा आहे. भारतीय तुरुंगातील परिस्थिती चांगली नसल्याबद्दलही तो कांगावा करत आहे. भारतात पाठवल्याने त्याच्या मानवी हक्कांवर नकारात्मक परिणाम होईल, असा कावा रचण्यात येत आहे. बेल्जियममधील प्रक्रिया जामीन अर्ज करण्याची नसून अपील दाखल करण्याची आहे. त्यानुसार आपल्याला कोठडीत ठेवू नये आणि कोठडीत नसताना स्वतःचा बचाव करण्याची आणि प्रत्यार्पणाच्या विनंतीला विरोध करण्याची परवानगी द्यावी, असे त्याच्या वकिलांचे म्हणणे आहे. मेहुल चोक्सीला कॅन्सर झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत, असा या अपिलाचा आधार असेल. त्याला बंद जागांची भीती वाटत असल्याने कायमस्वरूपी विकृती निर्माण झाली आहे. त्याला 'पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर' असल्याचा युक्तिवाद केला गेला. तपास यंत्रणांना सतत सहकार्य केल्यामुळे भारतीय कायद्यानुसार त्याला कधीही फरारी घोषित करण्यात आले नाही, असा दावा वकिलाने केला. यामुळे भारतीय एजन्सींच्या प्रत्यार्पणाची विनंती कमकुवत होऊ शकते.

मेहुल तपास प्रक्रियेत सामील होण्यास तयार आहे; परंतु वैद्यकीय स्थितीमुळे प्रवास करू शकत नाही, असा वकिलांचा बचाव आहे. तो व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे तपासात सहभागी होऊ शकतो, असे वकिलांनी सांगितले होते. मेहुलने केवळ पंजाब नॅशनल बँकेलाच गंडा घातला आहे, असे नाही. त्याने एका मोठ्या ज्वेलरलाही १२८ कोटी रुपयांना गंडा घातला आहे. मेहुल चोक्सीच्या अटकेवर गुजरातमधील भावनगर येथील रहिवासी दिग्विजय जडेजा यांच्या फसवणुकीच्या प्रकरणाची पुन्हा चर्चा सुरू झाली. त्यांनी चोक्सीच्या कंपनीकडे गुंतवणूक म्हणून रोख पैसे दिले होते. या व्यवहारात सुमारे १२८ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. २०१० मध्ये फ्रँचायझी घेण्यासाठी मेहुल चोक्सीला ही रक्कम देण्यात आली होती; परंतु आजपर्यंत फ्रँचायझी दिली गेलेली नाही. जडेजा यांनी त्या वेळी दिलेल्या फिर्यादीची दखल घेऊन अटक केली असती, तर चोक्सीला देशातून पळून जाण्याची आणि पंजाब नॅशनल बँकेला १३ हजार पाचशे कोटी रुपयांना गंडा घालण्याची संधीच मिळाली नसती. चोक्सीने केलेल्या घोटाळ्यांबाबत जडेजा यांनी सरकारला अनेक वेळा इशारा दिला; मात्र यंत्रणांनी काहीच केले नाही. चोक्सी २९ कंपन्यांचा मालक आहे. जडेजा यांच्या म्हणण्यानुसार, परदेशात चोक्सीच्या सर्व कंपन्या नफ्यात चालत असून भारतीय कंपन्या तोट्यात असल्याचे दाखवले जात आहे. जेणेकरून त्याला कर आणि गुंतवणूकदारांना पैसे द्यावे लागत नाहीत.

श्री. जडेजा यांनी २०१६ मध्ये गुजरात उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. चोक्सीकडे सुमारे ९८७२ कोटी रुपयांचे कर्ज आहे, त्याचा उल्लेख कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटवरदेखील आहे. चौक्सीच्या पत्नीचा दुबईच्या पॉश बुर्ज खलिफामध्ये फ्लॅट आहे; परदेशात पळून गेल्यास त्याच्यावरील सर्व खटले थांबवले जातील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली होती; परंतु यंत्रणांनी या सूचनेकडे लक्ष दिले नाही आणि ही भीती प्रत्यक्षात आली. पंजाब नॅशनल बँकेच्या मुंबई शाखेची चोक्सी आणि मोदीने १३ हजार ५०० कोटी रुपयांची फसवणूक केली होती. 'लेटर ऑफ अंडरटेकिंग'च्या आधारे हा निधी जारी करण्यात आला होता. बेल्जियममध्ये मेहुल चोक्सीच्या अटकेनंतर हे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले असून 'लेटर ऑफ अंडरटेकिंग' म्हणजे नेमके काय असा प्रश्न विचारला जात आहे. वास्तविक, 'एलओयू' ही एक प्रकारची बँक हमी आहे. हे एका बँकेकडून ग्राहकाच्या नावे दुसऱ्या बँकेला दिले जाते. 'एलओयू' जारी करणारी बँक दुसऱ्या बँकेला हमी देते. ती तिच्या ग्राहकाच्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करेल असे सांगत ही बँक कर्जाची हमी देते. मोदी आणि मेहुल यांनी काही भ्रष्ट बँक अधिकाऱ्यांच्या संगनमताने मार्च २०११ मध्ये 'पीएनबी'च्या मुंबईतील एका शाखेतून 'एलओयू'द्वारे पहिले कर्ज घेतले. पुढच्या सहा वर्षांमध्ये दोघांनी अशा १,२१२ बँक गॅरंटी जारी केल्या. त्यापैकी फक्त ५३ 'एलओयू' खऱ्या होत्या, बाकीच्या बनावट होत्या.

'पीएनबी'चे तत्कालीन उपमहाव्यवस्थापक गोकुलनाथ शेट्टी यांच्या मदतीने मेहुल आणि नीरव यांनी बँकिंग प्रणालीला बायपास केले आणि त्यांची बँक गॅरंटी त्वरीत पास करून घेतली. याद्वारे दोघांनी या बँकेच्या परदेशी शाखांमधून सुमारे ११,४०० कोटी रुपयांची रोकड काढून घेतली. मोती आयात करण्याच्या नावाखाली हा निधी घेण्यात आला. पैसे मिळाल्यानंतर व्यवसायात वापर करण्याऐवजी 'मनी लॉँड्रिंग'च्या माध्यमातून परदेशातील खात्यांमध्ये हस्तांतरण करण्यात आले. चोक्सीला भारतात आणले तरी बँका त्यांचे संपूर्ण पैसे वसूल करू शकतील की नाही, हे सांगणे कठीण आहे. मोदी परदेशात पळून गेल्यानंतर चोक्सीही पोलिसांना चकवा देऊन पळून गेला. 'पीएनबी' घोटाळ्याला सात वर्षे उलटून गेली आहेत; परंतु बँकेचे शेअर्स अद्याप चोक्सी आणि मोदी यांच्याशी संबंधित घोटाळ्यांच्या प्रभावातून पूर्णपणे सावरलेले नाहीत. या घोटाळ्याचा बँकेच्या ब्रँड व्हॅल्यूवर आणि गुंतवणूकदारांच्या विश्वासावर खोलवर परिणाम झाला. घोटाळा उघडकीस आल्यानंतर पाच महिन्यांमध्ये 'पीएनबी'च्या शेअरची किंमत जवळपास ५० टक्क्यांनी घसरली. आजही बँकेचे शेअर्स २०१८ पूर्वीच्या पातळीवर पोहोचलेले नाहीत. या प्रकरणाचा तपास अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि सीबीआय करत आहे.

फेब्रुवारी २०१८ मध्ये अंतर्गत तपास पूर्ण झाल्यानंतर पंजाब नॅशनल बँकेने बॉम्बे स्टॉक एक्सचेंजला या फसवणुकीची माहिती दिली. चोक्सी हा एके काळी भारताच्या हिरे व्यवसायाचा पोस्टर बॉय होता तर नीरव मोदीचे कुटुंब गेल्या अनेक पिढ्यांपासून हिऱ्यांच्या व्यवसायात होते. नीरव मोदीने भारतातील 'गीतांजली ग्रुप' या रिटेल ज्वेलरी कंपनीचे प्रमुख चोक्सी यांच्यासोबत सुमारे दहा वर्षे काम केले. यानंतर मोदीने भारतात 'फायरस्टार' डायमंड नावाची कंपनी सुरू केली. त्यांनी जशी फसवणूक केली, तशीच फसवणूक विजय मल्ल्याने केली. भारतीय तपास संस्था मल्ल्याला भारतात आणण्यासाठीही कायदेशीर लढाई लढत आहेत. त्याच्यावर भारतीय बँकांचे ९ हजार कोटी रुपयांहून अधिक कर्ज आहे. कंपनीसाठी बँकांकडून कर्ज घेऊन परतफेड न करता परदेशात गेल्याचा आरोप मल्ल्या याच्यावर आहे. भारत आणि ब्रिटनने १९९२ मध्ये प्रत्यार्पण करारावर स्वाक्षरी केली होती; परंतु तेव्हापासून केवळ एकाच व्यक्तीचे प्रत्यार्पण करण्यात आले आहे. नीरव मोदी आणि मल्ल्या आता तिथे आहेत. युरोपीय देशांचा मानवी हक्काबाबतचा कडक दृष्टिकोन लक्षात घेता आता चोक्सीला भारतात आणले जाते का आणि त्याने फसवणूक केलेल्यांचे पैसे परत मिळणार का, हा खरा प्रश्न आहे.



# डॉ. आंबेडकरांच्या जीवनप्रेरणांचा शोध...



अवघ्या ६५ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य, दुर्बलांसाठी केलेले कार्य भारताच्याच नव्हे, तर मानवतेच्या इतिहासात अजोड असे आहे. नुकतीच १४ एप्रिलला बाबासाहेबांची १३४ वी जयंती साजरी झाली. त्यांच्या या असामान्य कार्यामागील जीवनप्रेरणांचा हा वेध...

**अरुण खोरे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्रातून त्यांच्या कार्यामागील विविध प्रेरणांचे दर्शन घडते. त्यापैकी कोणत्याही काळातील नव्या पिढीला मिळणारी सर्वात मोठी प्रेरणा म्हणजे ज्ञानसाधना.

बाबासाहेबांचे वडील रामजी यांचे इंग्रजी अतिशय चांगले होते. आमच्या घरामध्ये वडिलांनीच शिक्षणाविषयीची आस्था आणि आवड निर्माण केली, असे बाबासाहेबांनी म्हटले होते. रामजी हे कबीरपंथी असल्याने त्यांना भजने आणि अभंग तोंडपाठ होते. शिवाय, घरात रामायण, महाभारत, पांडव-प्रताप आदी ग्रंथांवर निरुपण होत असे. वडील रोज संध्याकाळी संतांचे अभंग आणि कबीराचे दोहे म्हणत, त्याचाही प्रभाव आम्हा भावंडांवर पडला, असे बाबासाहेब सांगायचे.

**अफाट ज्ञानसाधना, अपार निष्ठा**

अमेरिकन विदुषी डॉ. एलिनॉर झेलियट यांनी बाबासाहेबांवरील निबंध ग्रंथात त्यांच्या ज्ञानसाधनेबाबत खूप बारकाईने नोंदी केल्या आहेत. विशेषतः बाबासाहेबांचा अमेरिकेतील ज्ञानसाधनेचा कालखंड कसा होता आणि त्यांनी त्यासाठी केलेल्या तपश्चर्येचे वेगळेपण त्यातून समोर येते.

अवघ्या २२ व्या वर्षी बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याकडून परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळाल्यावर ते अमेरिकेला रवाना झाले. या काळात त्यांनी एम. ए. चा अभ्यास केला.

१९१५ मध्ये ही पदवी त्यांना मिळाली आणि १९१६ ला त्यांनी पीएच. डी. पूर्ण केली. म्हणजे अवघ्या तेविसाव्या वर्षी बाबासाहेब सर्वार्थाने उच्चविद्याविभूषित झाले होते. हजारो वर्षे उपेक्षेची आणि वंचनेची वागणूक मिळालेल्या समाजातील हा एक असाधारण तरुण अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात जाऊन तेथील सर्वोच्च पदवी संपादन करतो, हे खूप महत्त्वाचे होते.

समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र, भारतातील जातिव्यवस्था यासह प्रगत देशांचे इतिहास आणि त्यांचे साहित्य यांचा सखोल अभ्यास या काळात बाबासाहेब करत होते. त्यांच्या ज्ञानसाधनेने आणि अपार निष्ठेने विद्यापीठातील अनेक प्राध्यापक आणि ग्रंथपाल भारावून गेले होते.

१९२३ मध्ये त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी मिळवली होती. एकूणच बाबासाहेबांची ज्ञानाकांक्षा आणि तिला दिलेली साधनेची जोड ही एक अपूर्व अशी प्रेरणा म्हणता येईल.

**अस्पृशांच्या वेदनेचा हुंकार**

बाबासाहेब १९१८ नंतर सामाजिक जीवनात उतरले आणि शेवटच्या श्वासापर्यंत दलित समाजासाठी कार्य करीत राहिले. ॲनिलिएशन ऑफ कास्ट या पुस्तकात त्यांनी या देशातील जातिवादाला वैचारिक आणि तर्कशुद्ध उत्तर देणारे अभ्यासपूर्ण प्रतिपादन केले आहे.

त्यावेळच्या सर्वच प्रस्थापित विचारवंतांना आणि नेत्यांना भारतातील जातिव्यवस्थेबाबत एक परखड मांडणी करणारा महान विद्वान आपल्यासमोर उभा ठाकल्याचे लक्षात आले. बाबासाहेबांनी मोठ्या प्रमाणात ग्रंथलेखनही सुरू केले. केवळ लेखन करूनच नव्हे, तर प्रत्यक्ष अस्पृश्यांचे आणि दुर्बल वर्गाचे प्रश्न मांडून, त्या संबंधीच्या लढ्यात प्रत्यक्ष सहभागी होऊन वाटचाल करण्याची भूमिका त्यांनी स्वीकारली.

मूकनायक आणि बहिष्कृत भारत ही त्यांनी सुरू केलेली पाक्षिके त्याचाच परिपाक होता. त्याचप्रमाणे सभा, मेळावे, परिषदांचे आयोजन करून त्यांनी अस्पृश्य वर्गाचे दुःख आणि दैन्य शब्दशः वेशीवर टांगले.

**आत्मसन्मानाचा लढा**

मागास समाजाने कुप्रथांतून बाहेर पडावे, अशी हाक त्यांनी दिली. मढ्यावरचे नवे कापड घेऊन ते घालू नका, मेलेल्या जनावरांचे मांस खाऊ नका, असे त्यांनी ठणकावून सांगायला सुरूवात केली. देशातला हा मोठा समाज आपल्या हजारो वर्षांच्या रुढींमधून बाहेर पडून आत्मसन्मानाच्या जाणिवेने जागा होत होता,

ही डॉ. आंबेडकरांच्या लढ्याची फलश्रुती गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशव्यापी स्वातंत्र्यलढा सुरू असतानाही जाणवू लागली होती. माणगावात भरलेल्या महाराष्ट्र अस्पृश्य परिषदेचे ते अध्यक्ष होते, त्यासाठी करवीर संस्थानच्या शाहू महाराजांनी त्यांना पाठबळ दिले होते. महाड येथे चवदार तळ्याच्या सत्याग्रहासाठी त्यांनी मागास समाजाला उभे केले आणि १९२७ च्या मार्चमधील हा लढा डिसेंबरपर्यंत सुरू ठेवला. लंडनला भरलेल्या गोलमेज परिषदेतही त्यांनी अस्पृश्य समाजाची गाऱ्हाणी मांडली आणि त्यासाठी प्रसंगी गांधीजींबरोबर संघर्षही केला.

**विद्या, स्वाभिमान, शील हीच दैवते**

बाबासाहेबांना मुंबईत १९५४ मध्ये त्यांच्या हीरक महोत्सवानिमित्त १ लाख १८ हजार रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. त्यांनी ही रक्कम आपल्या प्रकृतीसाठी खर्च करावी, अशी लोकांची इच्छा होती. तथापि, गरीब समाजाकडून अशी थैली स्वीकारणे बेशरमपणाचे आहे, असे परखडपणे सांगत त्यांनी ती देणगी सामाजिक संस्थांच्या इमारत फंडाला दिली.

या कार्यक्रमात बाबासाहेबांनी केलेले भाषण फार मोलाचे आहे. त्यांच्या जीवनप्रेरणा कशा स्वरूपात आकाराला आल्या असतील, याचा बोध त्यातून होतो. बाबासाहेब त्यावेळी म्हणाले, माझे आयुष्य तीन गुरु आणि तीन उपास्य दैवतांनी घडले आहे.

माझे पहिले आणि श्रेष्ठ गुरु गौतम बुद्ध, दुसरे गुरु कबीर आणि तिसरे गुरु म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले. जगाचे कल्याण फक्त बौद्ध धर्मच करू शकेल, हे सांगतानाच ज्योतिबा फुले यांचा मार्ग आम्ही कधीच सोडणार नाही, असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले.

वडील कबीरपंथी असल्यामुळे कबीरांच्या विचारांचा परिणाम आपल्यावर झाला. या तिघांच्या शिकवणीने आपले आयुष्य बनले, असे त्यांनी म्हटले होते. विद्या, स्वाभिमान आणि शील ही आपली तीन उपास्य दैवते आहेत. माझे विद्येचे वेड भयंकर आहे. कोणाची याचना करीत नाही, म्हणून मी स्वाभिमानी आहे आणि आयुष्यात दगाबाजी, फसवणूक केल्याचे आपल्याला आठवत नाही, अशा शब्दांत त्यांनी या उपास्य दैवतांचा उल्लेख केला होता.

देशाचे स्वातंत्र्य, लोकशाही टिकली पाहिजे आणि समाजात बदल घडला पाहिजे, हे स्वप्न बाबासाहेब पाहात होते. त्यासाठी राजकीय लोकशाहीबरोबरच आर्थिक आणि सामाजिक लोकशाही निर्माण व्हावी, ही त्यांची तळमळ होती. त्या दृष्टीने स्वातंत्र्य टिकवणे आणि लोकशाही बळकट करण्यासाठी सत्तेच्या जवळपास असणाऱ्या सर्वांनी डोळ्यात तेल घालून दक्ष राहिले पाहिजे, असे ते सांगत.

आज बाबासाहेबांना अभिवादन करताना, त्यांनी दिलेल्या प्रेरणांचे मोल जाणून घ्यायला हवे. त्या केवळ दस्तऐवजांमध्ये किंवा पुस्तकात राहणार नाहीत, तर प्रत्येक पिढीला दीपस्तंभाप्रमाणे दिशा दाखवण्याइतक्या सक्षम आहेत. ■ ■

(arunbk1954@gmail.com)



# कीर्तिवान! पुण्यवान!

भ्रमंती लाईव्ह स्टोरी



संदीप काळे
sandip98868@gmail.com
9890098868

परवा नाशिकला गेल्यावर मुक्त विद्यापीठाच्या परिसरात जेवायला गेलो होतो. साध्या झोपडीत एका चुलीवर एक बाई फाईव्ह स्टार हॉटेलमधील स्वयंपाकाला लाजवेल, असा स्वयंपाक करीत होती. त्या महिलेच्या दोन जुळ्या मुली मला आणि माझा मित्र गणेशला जेवायला वाढत होत्या.

जेवण झाल्यावर माझा सारथी विजय, त्या बाईच्या घरभर फिरून ती स्वयंपाकासाठी काय काय साधनसामुग्री वापरते, हे पाहण्यामध्ये मग्न झाला होता. घरात एकूण आठ भांडे होते. त्यातल्या चार भांड्यांत सारी औषधे, गोळ्या होत्या आणि चार भांड्यात जेवण बनवायचे साहित्य. माझा सारथी एकदम बडबड्या, हसी-मजाक करणारा. आम्ही दोघं बाहेर जेवत होतो.

माझा सारथी बाहेर आला आणि म्हणाला, 'संदीप सर, ह्या मावशी जेवणात मसाल्याऐवजी औषधाच्या गोळ्या टाकतात, असं मला वाटतं. त्यावर मी त्यांच्याकडे गंभीरपणे पाहिलं. तेव्हा तो तितकाच गंभीर होऊन मला म्हणाला, 'अहो सर, किचनमध्ये असलेल्या बऱ्याच डब्यांमध्ये गोळ्या आणि औषधे आहेत. मला दिसते, म्हणून मी तसं म्हणालो'. मी थोडीशी स्माईल विजयला दिली आणि पुन्हा शांतपणे जेवण करत होतो. विजय बोलता बोलता गंमतीत बोलून गेला.

या महिलेच्या घरात एवढ्या गोळ्या, औषधे का? असा प्रश्न माझ्या मनात सतत घोळत होता. जेवणानंतर मी त्या महिलेला त्या गोळ्या आणि औषधांबद्दल विचारल्यावर ती काहीच बोलत नव्हती. एकदम शांत असलेल्या महिलेने गोळ्या औषधाचे नाव काढल्यावर दोन्ही मुलीकडे गंभीरपणे कटाक्ष टाकला. माझ्या लक्षात आलं की, काहीतरी गंभीर विषय असणार. खूप खोदून, खोदून विचारल्यावर ती महिला आजारी आहोत, काहीतरी झालंय, असं सांगत होती.

स्वयंपाक करणाऱ्या त्या महिलेच्या पतीचा फोटो घरामध्ये दर्शनी भागात लावला होता. त्या फोटोला घातलेल्या हारामुळे त्यांचं अलीकडच्या काळामध्येच निधन झाल्याचं लक्षात येत होतं. आता गणेश आणि विजय दोघेही बाहेर गेले होते.

एकान्त आहे हे लक्षात घेऊन हळूच सांगितलं, 'कारभारी आणि मला दोघांनाही मोठा आजार झाला होता. त्यात कारभारी जात राहिले. तो आजार माझ्या दोन्ही मुलींनाही झाला. कुणाचा तरी आधार मिळाला आणि या आजारातून आम्ही तूर्तास तरी सगळे विसरून कामाला लागलो'. त्या महिलेने मागच्या अनेक वर्षांपासूनच आजारामुळे त्रासून गेलेले जीवन माझ्यासमोर ठेवले.

त्या महिलेसोबत काम करणारी दुसरी एक महिला, तिनेही जे काही घडलं ते मध्ये मध्ये सांगायला सुरुवात केली. काय-काय खाचखळग्यांनी भरलेलं एखाद्याचं आयुष्य असतं! ज्या आयुष्याला वाट काढता काढता नाकी नऊ येऊ लागतात. त्यातच असं कोणीतरी भेटतं, जो आधार देतो. आणि मग आयुष्य जगण्याचा पुन्हा लळा लागतो, असंच काहीसं या कुटुंबाच्या बाबतीत झालं होतं.

मी ज्या महिलेशी बोलत होतो, त्या महिलेचे नाव रत्नमाला सूर्यवंशी. रत्नमाला सूर्यवंशी हिचे पती, त्र्यंबक सूर्यवंशी यांचे एच आय व्ही संसर्गाने निधन झाले. रत्नमालासह तिच्या दोन्ही मुली एच. आय. व्ही. बाधित आहेत.

रत्नमालाकडे काम करणारी गीताबाई नावाची महिला कॅन्सरग्रस्त आहे. तिने मुंबईमध्ये एका डॉक्टरच्या मदतीने कॅन्सरचे मोफत उपचार घेतले. ज्या मुंबईच्या डॉक्टरने त्या महिलेला खूप मदत केली, त्याच डॉक्टरांचा संदर्भ घेऊन रत्नमाला मुंबईला उपचारासाठी मुंबईला गेली. योग्य वेळी योग्य तास उपचार न झाल्यामुळे रत्नमालाचे पती त्रिंबक यांचे निधन झालं होतं.

रत्नमाला आणि तिच्या दोन्ही मुलीला त्याच मदत करणाऱ्या डॉक्टरांनी समुपदेशनच्या माध्यमातून बाहेर काढलंच काढलं. त्यांच्यावर होणारा पूर्ण औषधाचा खर्च, त्यांचा येण्याजाण्याचा खर्च सर्व काही डॉक्टरांनी स्वतः करून दिले. रत्नमाला, गीताबाई आणि जाई-जुई ह्या चौघीजणीही त्या मुंबईच्या डॉक्टरांचे अफाट कौतुक करत होत्या.

गीताबाई म्हणाली, 'आमच्या परिसरातील अनेकांना त्या डॉक्टरांनी देवदूत बनून मदत केली आहे. माझ्या गावातील एका माणसाच्या सांगण्यावरून मी त्या डॉक्टरांकडे गेले आणि माझा जीव वाचला'. असं गीताबाई सांगत होत्या. ते डॉक्टर कोण? ते कुठे राहतात? त्यांचा पत्ता काय आहे? त्यांचा संपर्क नंबर काय आहे? त्यांची संस्था कुठली? अशी माहिती मी रत्नमाला यांच्याकडून घेतली आणि परत जायला मुंबईकडे निघालो.

मी बाहेर पडणार, इतक्यात रत्नमालाची मुलगी जुई मला म्हणाली, 'आमच्याकडे परत जेवायला येणार ना भाऊ?' मी लगेच म्हणालो, 'हो येणार. ना का नाही येणार?'

त्यावर जुई म्हणाली, 'जेव्हा आम्हाला मोठा आजार आहे हे लोकांना कळतं, तेव्हा ती माणसं आमच्याकडे जेवायला येणं बंद होतं. आणि ह्यातील माणसे जेवायला येणं बंद झालं की, उदरनिर्वाहाचे सगळे मार्ग बंद होतात. तिचे ते बोलणं ऐकून माझं मन एकदम सुन्न झालं. तिला काय बोलावं, हे मला कळत नव्हतं.

मी तिला हळूच म्हणालो, 'तुम्हाला जो आजार झाला आहे, तो आजार तुमच्या सहवासात कुणीही आलं तरी त्याला होत नाही. त्यामुळे घाबरायचं काही कारण नाही. जी माणसं अडाणी आहेत, त्यांना काहीच कळत नाही. ते अशा प्रकारचा दुरावा करीत असतील. मी खिशामध्ये हात घातला खिशात थोडेबहुत पैसे होते, ते त्या मुलीच्या हाती ठेवले आणि मी माझा परतीच्या मागार्ला लागलो.

मुंबईच्या त्या डॉक्टरांनी त्या महिलेचे तिच्या कुटुंबीयांचे प्राण का वाचवले असतील? त्या सर्वांसाठी स्वतः खर्च का केला असेल? त्या डॉक्टरांनी अनेकांना का मदत केली असेल? असे अनेक प्रश्न मला पडले होते. मी अधिकचा विलंब न लावता त्या डॉक्टरांना फोन केला. त्यांच्याशी माझं प्राथमिक स्वरूपात बोलणं झालं. मुंबईमध्ये गेल्यावर भेटण्यासाठी त्यांची वेळही घेतली.

ज्या दिवशी भेटीची वेळ ठरली होती, त्याच दिवशी सकाळी डॉक्टर फोन करून मला म्हणाले, 'मी रात्री मुरबाडजवळच्या एका आदिवासी पाड्यावर तपासणीसाठी गेलो होतो. तिथे आसपासचे अनेक रुग्ण आले होते. त्यामुळे रात्री खूप उशीर झाला. सकाळी त्याच भागात दुसरीकडे एका ठिकाणी महिलांसाठी आरोग्य शिबीर लावले होते. म्हणून तिकडेच थांबलो. मी दिलेल्या पत्त्यावर, तुम्ही आदिवासी पाड्यावर येऊ शकाल का?'

क्षणाचाही विलंब न लावता मी 'हो' म्हणालो. आदिवासी पाड्यावर सकाळी सकाळी जाऊन पोहोचलो. तिथे महिलांची प्रचंड गर्दी होती. छान ड्रेसमध्ये चष्मा, टोपी घालून डॉक्टर सगळ्यांना तपासत होते. 'बस बेटा, जा बेटा, ये बेटा, बेटा, बेटा, बेटा' हाच शब्द डॉक्टरांच्या तोंडी होता. डोळ्यांची तपासणी, रक्ताची तपासणी, तिथेच रिपोर्ट, तिथेच औषधे, सगळ्या प्रकारच्या रोगांवर उपचार आणि औषध एकाच ठिकाणी देण्याची व्यवस्था डॉक्टरांनी केली होती.

मी नमस्कार करून डॉक्टरांना माझी ओळख करून दिली. ते म्हणाले, 'आता एवढे पेशंट झाले की, आपण गप्पा मारत बसू.

मी आसपास असणाऱ्या अनेक लोकांना 'हे डॉक्टर कोण आहेत? ते कधीपासून येत आहेत?' हे विचारत होतो. तसे डॉक्टरांचे काम शहरातल्या लोकांसाठी असते, पण या डॉक्टरांना मात्र आदिवासी पाड्यांवर किंवा ग्रामीण भागामध्ये भेटण्यासाठी, त्यांची सेवा करण्यासाठी यावं वाटते. ही डॉक्टरांची खासियत होती.

डॉक्टर त्यांच्या तंद्रीत रुग्ण तपासण्यामध्ये गर्क झाले होते. मग आमचं बोलणं सुरू झालं. लोक भेटायला येत होते. आम्ही जेवण केलं. तिथल्या परिसरात फेरफटका मारला, तरी आमचं विषयाला धरून बोलणं सुरूच होतं.

एका छोट्याशा शहरातला मुलगा, ज्याचे वडील साधे किराणा दुकान चालवायचे, तो मुलगा आज जगातल्या ऐंशी देशांमध्ये जाऊन आरोग्यसेवेचे काम करतो.



व्यवसाय आणि आरोग्य याचा तीळमात्र संबंध न ठेवता, केवळ सामाजिक भाव ठेवून येणारा, प्रत्येक रुग्णाला बरं करायचं ही माझी जबाबदारी आहे असं समजत, लाखो रुग्णांचा खर्च उचलत जगाला सामाजिक सेवेने भुरळ घालणाऱ्या डॉ. महाजन यांची कहाणी थक्क करणारी होती.

डॉ. प्रदीप महाजन (८८९८०७०९०४) नांदेड येथील जुना मोंढा भागातील व्यंकटराव महाजन या व्यापाऱ्याचा मुलगा. घरी छोटे दुकान, सहा भाऊ. वडिलांना वाटायचं की, सहापैकी एकातरी मुलानं डॉक्टर व्हावं, सेवाभावी कामाचा घरात असणारा वारसा पुढे चालवावा.

तेव्हाच्या हलाखीच्या परिस्थितीत डॉ. महाजन अंबाजोगाई येथे वैद्यकीय शिक्षण घेतले. संभाजीनगरमध्ये त्यांनी उच्च शिक्षण घेतले. अमेरिकेत सुपर स्पेशलायझेशन केले. मुंबईच्या कोपरखैरणे भागात १९८८ला त्यांनी स्वतःचा एक छोटासा दवाखाना सुरू केला. या काळातही त्यांनी शिक्षण बंद केलं नाही. वेगवेगळ्या प्रकारच्या बारा उच्च पदव्या मिळाल्यानंतर डॉक्टर तेरावी पदवी घेण्यासाठी आजही शिकत आहेत.

मूत्रतज्ञ आणि मूळपेशी यातील तज्ञ अशी डॉक्टरांची ओळख आहे. या डॉक्टरांच्या वेगवेगळ्या खासियत आहेत. त्यातील पहिली खासियत आहे, येणारा रुग्ण हा माझ्यासाठी एक जबाबदारी घेऊन येतोय. तो माझ्यापर्यंत आला म्हणजे तो जबाबदारीतून मुक्त होतो.

आता मी त्याला बरा करणार आहे. त्याच्याकडे पैसा आहे का नाही, याचं मला काही देणंघेणं नाही. हे काम गेल्या कित्येक वर्षांपासून डॉक्टर अविरतपणे करत आहेत. त्या पाड्यावरून आम्ही निघालो. एकाच गाडीमध्ये सुरू झालेल्या प्रवासात आमच्या गप्पा सुरूच होत्या. मी डॉक्टराना म्हणालो, 'डॉक्टर साहेब, टोपी काढा आता. आपण एसी गाडीत आहोत'.

डॉक्टर साहेबांनी टोपी काढली आणि लगेच टोपी घातली. म्हणाले, 'ही टोपी माझ्या वडिलांची देण आहे. माझे वडील गेले, तेव्हा मी केस कापले, तेव्हा टोपी घातली. तेव्हा सारेच म्हणत होते, टोपी खूप छान दिसते. मग अनेक पद्धतीच्या टोपी घेतल्या आणि ती नियमित घालत आहे.

डोळ्यांवरचा चष्मा काढत डोळ्यांत आलेले पाणी पुसत डॉक्टर म्हणाले, 'बाप जातानाही काहीतरी देऊन गेला. लहानपणी दुकानात बसलेला बाप चणे फुटण्यासाठी १० पैसे द्यायचा. उड्या मारत चणे फुटाणे खायचे. घरी आल्यावर बाप म्हणायचा, 'जसा तुला जसा आनंद मिळतो ना, तसा लोकांच्या दुःखात सहभागी हो. त्यांच्या चेह?यावर आनंद पाहा. पोरा, डॉक्टर हो'. मला घेऊन बापाच्या डोळ्यात सेवाभावी स्वप्न होते. आज जगभरात आरोग्याचे काम करताना माझा बाप मला त्या प्रत्येक दुःखितांच्या चेहऱ्यावर हसू आल्यावर दिसतो'.

डॉक्टर जे जे बोलत होते, ते सारे काही अद्भुत होते. ते सारे मी शांतपणे ऐकत होतो. डॉ. प्रदीप महाजन जगातल्या त्या सर्व सर्वश्रेष्ठ डॉक्टरांमधील एक होते. त्यांच्या स्पेशल असलेल्या विषयापेक्षा सर्वसमावेशक विषयात रुची घेऊन ते प्रचंड काम करतात. जगातल्या ८० देशांत आरोग्याच्या निमित्ताने नेहमी जायचेत असलेल्या देशात डॉ. प्रदीप महाजन यांनी आरोग्यक्षेत्रात, संशोधनात, शिकवणीत दिलेले योगदान कदाचितच कुणी दिले असेल.

डॉ. प्रदीप महाजन यांनी भारतासह केनिया, मॉरिशस, नेपाळ, घाणा या देशांत सेवाभावी दवाखाने उभे केले आहेत. मी डॉ. प्रदीप महाजन यांना म्हणालो, 'सर, जगातील आरोग्यसेवा आणि भारतातील आरोग्यसेवा याकडे तुम्ही कसे पाहता?

त्यावर डॉ. महाजन म्हणाले, 'भारत सर्वच बाबतीत आघाडीवर आहे. आरोग्यसेवेत भारताने अमेरिकेलाही मागे टाकले आहे. अलीकडे तर रिसर्च, विमा सुविधा, एकूण आरोग्य यंत्रणा यात भारताने दिलेले योगदान खूप मोठे आहे. फक्त धंदा म्हणून आरोग्यसेवेकडे पाहणाऱ्या लोकांवर वचक ठेवायला अनेक वेळा सरकारी यंत्रणा कुचकामी ठरते'.

डॉक्टर बोलताना मी नाशिकची रत्नमाला आणि गीताबाई यांचा विषय काढला. त्यावर डॉक्टर म्हणाले, 'देवाने आपल्याला भरपूर दिले आहे. त्यातले थोडे थोडे इतरांना द्यायचे. आपला जन्म इतरांना देण्यासाठीच झाला आहे, हे माझ्या वडिलांचे सूत्र घेऊन मी आयुष्यभर पालन केले. आपल्या पेशंटच्या चेहऱ्यावर हसू आले पाहिजे. माझ्याकडे सेवाभाव आहेच. यात अजून वाढ होतच राहते. सेवाभाव रुजावा, सोबतच्या टीमने, दुसऱ्या पिढीने माझा वारसा कायम चालू ठेवावा, यासाठी मी फॅमिली वेल्फेर चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली. मोफत रुग्णसेवा, विम्यातून आरोग्यसेवा, शासकीय मदतीतून आरोग्य सेवा, वेगवेगळ्या आरोग्यसुविधांमधून आरोग्यसेवा देत रोज किमान शंभर रुग्ण मी पाहत असेन.

आम्ही बोलत बोलत डॉ. महाजन यांच्या कोपरखैरणे येथील घरी पोहचलो. डॉ. महाजन म्हणाले, 'मला परदेशातील दोन ऑपरेशन करायचे आहेत. तुम्ही थोडे बसा', यावर मी डॉक्टरांना म्हणालो, 'मी सोबत असलो, तर चालेल काय?' डॉक्टर म्हणाले, 'येस कम, कम'.

मी ऑपरेशन थेटरमध्ये गेलो. एक आफ्रिका आणि दुसरे दुबई या दोन ठिकाणच्या दोन पेशंटचे ऑपरेशन डॉक्टरांनी केले. मी फार चकित झालो. दीड तासात दोन ऑपरेशन झाले होते. कात्री घ्या, कापा, शिवा. हे औषध द्या, ते औषध द्या. संपूर्ण ऑपरेशन होईपर्यंत डॉक्टरांचे डोळे आणि हात भरभर काम करीत होते.

ऑपरेशन थेटरच्या बाहेर आल्यावर गावकुसातून आलेले अनेक रुग्ण डॉक्टरांनी तपासले. एक तंत्रज्ञ दवाखान्यात आलेल्या नवीन मशीन सुरू करून युद्धपातळीवर काम करीत होता. एक महिला सर्वांना 'जेवण केले का? काही अडचण आहे का? औषधी घेतली का?' अशी विचारणा करीत होती.

तो व्यक्ती आणि ती महिला यांची ओळख करून देताना डॉ. महाजन म्हणाले, 'हा माझा मुलगा सिद्धान्त आणि ही माझी पत्नी विपुला, सर्व सांभाळतात. सिद्धान्त आर्मीमध्ये ऑफिसर होता. आता खूप मोठ्या प्रमाणावर रिसर्च करतो. माझे दवाखान्याचे संपूर्ण व्यवस्थापन तोच सांभाळतो'. माझ्या लक्षात आले डॉक्टरांनी त्यांचा सेवेचा वारसा पुढे चालवण्यासाठी माणसे तयार केली आहेत.

डॉ. महाजन एका स्कुटरवर हात ठेवत म्हणाले, 'संदीप, माझा मोठा भाऊ विजयकुमार महाजन यांनी मला डॉक्टर झाल्यावर ही स्कुटर दिली होती. बापाच्या नंतर भाऊ बाप म्हणून सावली देत असतो. तसेच समाजाच्या बाबतीत असते.

कोणी काहीही देणार नाही, कोणी जाणीव ठेवणार नाही, कोणी मदत करणार नाही, हे माहिती असतानादेखील आपण समाजासाठी काम करीत राहणे, त्यात सात्यत्य ठेवणे हे फार आवश्यक आहे.

मी संस्थेच्या ऑफिसमध्ये पाहत होतो. पुढचे दहा बारा दिवस जगभर आरोग्य कॅम्पचे नियोजन केले आहे. कुठे औषधी पाठवायचे आहेत, कुठे रुग्णाच्या नातेवाईकाला पैसे द्यायचे, कुठे सांत्वनासाठी भेटीला जायचे आहे. बापरे! एक माणूस किती कामे करतो!

मी नुसता विचार करीत होतो. जगभर डॉक्टरांचा अनेक वेळा सन्मान झालाय, पण आपल्या देशात मात्र डॉक्टरांचा सन्मान झाला नाही, हेच मी पाहत होतो. एवढे मोठे साम्राज्य सांभाळायचे कसे? हा प्रश्न डॉक्टर साहेब यांच्या समोर नक्की आहे. उद्याचा खर्च भागवायचा गंभीर विषयही आहे. अनेक विषय गंभीर आहेत, तरीही डॉक्टर साहेबांचा सेवेचा उत्साह काही कमी झाला नाही.

मी डॉक्टरांचा निरोप घेऊन निघणार, इतक्यात सिद्धान्त आणि विपुल यांनी माझा पाहुणचार केला. मराठवाड्यात प्रसिद्ध असलेल्या ह्यसाळीच्या जेवणाने मी एकदम तृप्त झालो आणि मलबार हिलकडे निघालो. मी विचार करीत होतो, काही काही माणसे किती मोठमोठे कामं करतात!

आज जगाच्या कानाकोपऱ्यात डॉ. प्रदीप महाजन आरोग्य सेवेचा वसा घेऊन प्रचंड पुण्याचे काम करीत आहेत. त्यांच्या कामातून त्यांची कीर्ती साता समुद्रापार गेली आहे. त्यांचे काम आणखी उत्साहात चालण्यासाठी त्यांना आर्थिक आणि मानसिक मदतीची गरज नक्कीच आहे. आपल्या अवतीभोवती असे कीर्तिवान, पुण्यवान अनेक हिरे आहेत, ज्यांना तुमच्या आमच्या सर्वांच्या मदतीची गरज आहे. बरोबर ना?

■ ■ ■

# शिक्षकांनी जबाबदारी प्रामाणिकपणे पूर्ण करावी : नंदकुमार बनकर

## येवल्यात होरायझन अकॅडमीमध्ये मविप्र सेवकांची तालुकास्तरीय सहविचार सभा

**येवला ।** शिक्षकांनी स्वतः परिपूर्ण राहून विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करावे. दर्जेदार शिक्षण दिले तर विद्यार्थी घडतील. गुणवत्ता असेल तर विद्यार्थी स्पर्धेत टिकतील. त्यामुळे शिक्षकांनी स्वीकारलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पूर्ण करावी, असे प्रतिपादन मविप्रचे येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर यांनी केले.

येवला येथे होरायझन अकॅडमीमध्ये मविप्र सेवकांच्या तालुकास्तरीय सहविचार सभेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले, की विद्यार्थी हे आपले दैवत मानून तसेच आपली मुले आहेत, असे समजून शिक्षकांनी ज्ञानार्जन करावे. उत्तम शिक्षण दिले तर विद्यार्थी संख्या आपोआप वाढेल. शाळेचे स्टेअरिंग हे शिक्षकांच्या हाती असते. शालेय शिस्त व




गुणवत्तेत तडजोड न करता शाळेचा व संस्थेचा नावलौकिक वाढवावा. कला, क्रीडा व विविध स्पर्धा परीक्षांना जास्तीत जास्त विद्यार्थी बसवून गुणवत्ता यादीत मुले कसे येतील, यासाठी मेहनत घ्यावी. शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीप्रमाणे कामकाज करावे, असेही बनकर यांनी आवर्जून सांगितले. प्राचार्य आर. एस. पाखले, आर. सी. महाले, डी. जी. पानसरे, एम. ए. भगत यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध मुद्यांवर शिक्षकांना मार्गदर्शन केले.

यावेळी येवला तालुक्यातील मविप्रच्या पाटोदा, जळगाव नेऊर, मुखेड, देशमाने, गवंडगाव, अंगणगाव, निमगाव मढ, कुसमाडी, पिंपळगाव जलाल, आडगाव रेपाळ आदी सर्व शाखांमधील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी सेवक उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य आर. एस. पाखले, एम. ए. भगत, डी. जी. पानसरे, आर. सी. महाले, राजुळे, गायकवाड, शिंदे, ठाकरे, ढगे, सोनवणे, साबळे, खैरनार आदी शाखाप्रमुख उपस्थित होते. मुख्याध्यापिका सुनीता हिंगडे यांनी स्वागत केले. आर. एस. पाखले यांनी प्रास्ताविक केले. साबळे यांनी आभार मानले.

# म्हसरूळ येथे डॉ. आंबेडकर जयंती विविध कार्यक्रमांनी उत्साहात

**नाशिक ।** म्हसरूळ येथील राजवाडा व परिसरात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.भव्य मिरवणूकांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.यावेळी निळ्या पताका, वेशभूषा, फेटाटोप्यांनी म्हसरूळ दिंडोरीरोडचा सर्व परिसर निळाईने रंगला होता.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून रिपाइंचे प्रदेश अध्यक्ष प्रकाश लोंढे, जिल्हाध्यक्ष शशी उन्हवणे, माजी महापौर सौ. रंजना भानसी, माजी नगरसेवक अरूण पवार, वसंतराव मोराडे, माजी स्थायी समिती सभापती गणेश गिते आदी उपस्थित होते. यावेळी प्रकाश उखाडे, भाऊसाहेब नेहरे, विष्णूपंत सातकर, अशोक मोराडे, गंगाधर महाले, प्रशांत मोराडे, राजू थोरात, योगेश मोराडे, गंगाधर मोराडे, अनिल मोराडे, रविकिरण पगारे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून



**म्हसरूळ गावातील राजवाडा-जय बलभीम मित्र मंडळातर्फे आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळ्यात जयंती उत्सव समितीकडून रविकिरण पगारे, नितीन पगारे यांच्या हस्ते म्हसरूळ ग्रामस्थांना स्मृतीचिन्ह देऊन गौरवण्यात आले.याप्रसंगी माजी नगरसेवक वसंतराव मोराडे, अशोक मोराडे, प्रकाश उखाडे, विष्णूपंत सातकर, योगेश मोराडे, राजू थोरात,गंगाधर मोराडे,प्रशांत मोराडे, गंगाधर महाले, सुनील मोराडे आदी.**

अभिवादन करण्यात आले. जयंती उत्सवा निमित्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देण्यात आली. सायंकाळी म्हसरूळ गांव व परिसरात विविधरंगी पुष्प आणि विद्युत रोषणाईतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आकर्षक रथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी झालेली फटाक्यांची आतिषबाजी लक्षवेधी ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित कार्यक्रम आणि मिरवणूक यशस्वीतेसाठी म्हसरूळगांव, राजवाडा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अंतर्गत जय बलभीम मित्र मंडळाचे नितिन पगारे आणि प्रवीण पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली जय बलभीम मित्र मंडळाचे अध्यक्ष वरद पगारे, कार्याध्यक्ष तेजस गांगुर्डे, खजिनदार प्रज्वल पगारे, वरूण पगारे, गणेश पगारे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

### आरटीओ कॉर्नर येथेही महामानवाला अभिवादन

म्हसरूळ, दिंडोरीरोडवरील आरटीओ कॉर्नर येथे रवी गायकवाड, स्नेहनगर भागात प्रवीण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. डॉ आंबेडकर नगरातील रहीवासी मंडळाकडून जयंती निमित्त येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून पारंपरिक पद्धतीने जयंती साजरी करण्यात आली.याशिवाय म्हसरूळगांव ते आरटीओ कॉर्नरपर्यंत ठिकठिकाणी विविध सामाजिक संस्था व मंडळाच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित सर्व कार्यक्रम व मिरवणुकीत मोठ्या संख्येने भीमसैनिक व विविध मान्यवर आणि म्हसरूळ ग्रामस्थ सहभागी झाले होते. म्हसरूळ पोलीस ठाण्याकडून चोखपणे बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## 'योग विद्या गुरुकुल' कॅम्पसमध्ये विजन हॉस्पिटलतर्फे सीपीआर कार्यशाळा



**नाशिक ।** विजन हॉस्पिटलच्या चॅरिटी फाउंडेशन "VUHF" तर्फे "योग विद्या गुरुकुल" कॅम्पसमध्ये, तळवाडे, त्र्यंबक नाशिक येथे CPR/COLS कार्यशाळा घेण्यात आली. ६० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना कार्डिएक अरेस्ट रेसुसिटेशनचे प्रशिक्षण देण्यात आले. यापूर्वीही योग विद्या गुरुकुलच्या इतर शाखांमध्ये अनेक कार्यशाळा घेतल्या आहेत.

या कार्यशाळेतील विशेष आकर्षण म्हणजे कॅम्पस मध्ये AED (Automated External Defibrillator) चे इंस्टॉलेशन. अनेक विदेशी सहभागी आणि ज्येष्ठ नागरिक नियमितपणे येथे येत असल्यामुळे, त्यांच्यासाठी ही सुविधा अधिक सुरक्षितता निर्माण करेल. ही AED मशीन विजन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या चॅरिटी संस्था "Vijan's Uniq Healthcare Foundation" तर्फे बसवलेली तिसरी AED आहे. आमचे उद्दिष्ट नाशिकमध्ये ४० पेक्षा अधिक AED उपलब्ध करून देणे आहे. ही कार्यशाळा डॉ. सृष्टी विक्रांत विजन आणि डॉ. विनोद विजन व त्यांचे हॉस्पिटल कर्मचारी यांनी एकत्रितपणे घेतली. आमचे अंतिम उद्दिष्ट "नाशिकला हृदय सुरक्षित आणि हृदय दृढ बनवणे" हे आहे.

## राज्य लॅक्रॉस अजिंक्यपद स्पर्धेत नाशिकच्या खेळाडूंची दोन गटात सुवर्णपदकांची कमाई

**नाशिक ।** पुणे येथे दिनांक १५ आणि १६ एप्रिल दरम्यान महाराष्ट्र राज्य लॅक्रॉस अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन गटांचा समावेश होता. या स्पर्धेत ज्युनियर गटामध्ये नाशिक जिल्ह्याच्या मुलांच्या आणि मुलींच्या संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून विजेतेपद मिळविले.

वरिष्ठ गटात मात्र नाशिकच्या संघाला उपांत्य फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. नाशिकच्या मुलांच्या संघाकडून अथर्व गोडसे, शशांक सुनार, हर्ष चौधरी, साई साळुंखे, प्रथमेश जोशी आणि योगेश गायकवाड या खेळाडूंनी एकमेकांमध्ये चांगला समन्वय साधून अंतिम लढतीत बुलढाणा संघाला ४-१ असे पराभूत करून



विजेतेपद आपल्या नांवे केले. मुलींच्या ज्युनियर गटामध्येही नाशिकच्या खेळाडूंनी अशीच लय कायम राखत चांगला खेळ करत यजमान पुणे संघावर विजय मिळवून विजेतपद मिळविले. विजेत्या संघातील खेळाडूंना महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुमित्रा ठाकूर, सचिव डॉ. मोहम्मद बाबर, प्रशांत नाईक, विशाल पवार यांच्या हस्ते विजयी चषक प्रदान करून सन्मानित करण्यात आले. खेळाडूंना शशिक भूषण सिंग, अविनाश वाघ, शैलेश रकिबे, सतीश बोरा यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या या यशाबद्दल आ. राहुल ढिकले, लॅक्रोस असोसिएशन ऑफ नाशिकचे अध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आनंद खरे, अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बनकर लॅक्रोस असोसिएशन ऑफ नाशिकचे सरचिटणीस दीपक निकम, अशोक कदम, दीपक पाटील यांनी अभिनंदन केले आणि या खेळामध्ये असेच यश प्राप्त करावे अशा शुभेच्छा दिल्या.

**राज्य स्पर्धेचा निकाल :** १७ वर्षे मुले- १) नाशिक २) बुलढाणा ३) धुळे, १७ वर्षे मुले- १) परभणी २) बुलढाणा ३) नंदुरबार, वरिष्ठ गट मुले- १) परभणी २) बुलढाणा ३) कोल्हापूर, १७ वर्षे मुली- १) नाशिक २) पुणे, १७ वर्षे मुले- १) बीड २) नंदुरबार, वरिष्ठ गट मुली- १) अमरावती, २) नागपूर.

# सीमंतिनी कोकाटेंच्या वाढदिवसानिमित्त सिन्नरमध्ये विविध उपक्रम

## रक्तदान, आरोग्य तपासणी, शेतकऱ्यांसाठी सवलती, विद्यार्थ्यांसाठी पुस्तके

**सिन्नर ।** सामाजिक बांधिलकी, संवेदनशील नेतृत्व आणि नव्या पिढीच्या उमेदीचं प्रतीक ठरणाऱ्या सीमंतिनी कोकाटे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सिन्नरमध्ये अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या कन्या असलेल्या सीमंतिनी कोकाटे यांनी या दिवशी फक्त कार्यक्रमांचं आयोजन केलं नाही, तर स्वतः रक्तदान करून जनतेला कृतीतून संदेश दिला.

सिन्नर बसस्थानकाजवळील संपर्क कार्यालयाजवळ 'राजस्व अभियान' राबवण्यात आले, ज्यामध्ये नागरिकांना महसूल विभागाच्या योजनांची माहिती, मार्गदर्शन आणि सेवा देण्यात आली. त्याचबरोबर रक्तदान शिबीर उत्साहात पार पडले, ज्यात अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. सीमंतिनी कोकाटे यांनी स्वतः रक्तदान करून या उपक्रमात प्रत्यक्ष सहभाग घेतल्याने उपस्थितांत प्रेरणेची लहर उमटली.

या दिवसाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सिन्नर तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांवर एकाच दिवशी





आरोग्य तपासणी शिबिरांचं आयोजन करण्यात आलं. देवपूर, सोमठाणे, नायगाव, पांढुर्ली, ठाणगाव, वावी, दापूर आणि सिन्नर ग्रामीण उपजिल्हा रुग्णालय याठिकाणी शिबिरं झाली.

ग्रामीण भागात एकूण ११५१ रुग्णांनी सेवा घेतली. दुग्ध व्यवसायातील शेतकऱ्यांसाठी विशेष सवलतीत मिल्किंग मशीन केवळ १९,००० रुपयांत देण्यात येत आहे (मूळ किंमत २७,००० रुपये). या आधुनिक मशीनमध्ये 750 LPM पंप, 1 HP मॅरेथॉन मोटर, 25 लिटर SS बकेट, डबल पॉवर सिंगल बकेट सिस्टम आणि इतर तांत्रिक सुविधांचा समावेश आहे. अनेक शेतकऱ्यांनी याचा लाभ घेत तत्काळ बुकिंग केलं. सदर बुकिंग ५ मे पर्यंत सुरू राहणार आहे. १६ एप्रिल रोजी ज्वालामाता मंगल कार्यालय, सिन्नर येथे शुभेच्छा सोहळा उत्साहात पार पडला. सकाळी ११ ते संध्याकाळी ५ या वेळेत हजारो नागरिक, कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी उपस्थित राहून शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी सीमंतिनी कोकाटे यांनी एक अभिनव उपक्रम राबवला. शुभेच्छा देणाऱ्या प्रत्येकाने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेसाठी पुस्तके भेट स्वरूपात द्यावीत, असे आवाहन त्यांनी केलं. या सामाजिक आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मदत मिळाली. या सर्व उपक्रमांमधून सीमंतिनी कोकाटे यांची सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि जनतेशी असलेली जवळीक अधोरेखित झाली. त्यांनी दाखवलेली कृती आणि विचार यामुळे माणिकराव कोकाटे यांच्या सार्वजनिक कार्यपद्धतीचा वारसा पुढे नेत, एक संवेदनशील व जागरूक नेतृत्व उदयास येत आहे, अशी सर्वत्र चर्चा रंगली आहे.

## महत्त्वाचे

### मस्तानी अम्मा पुरुष उर्स उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अय्याज शेख

**नांदगाव ।** येथील मस्तानी अम्मा उर्स समितीच्या अध्यक्षपदी आयाज शेख यांची



आमदार सुहास कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली एकमताने निवड करण्यात आली. यावेळी आ. कांदे यांनी अय्याज शेख यांना शाल व पुष्पहार देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. तसेच उर्स समितीचे माजी अध्यक्ष सागर हिरे, शकील शेख, जगताप सर, प्रमोद भाबड, संजय सानप, मुस्ताक शेख, भाऊराव बागुल, महेंद्र गायकवाड, रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाचे देविदास मोरे आदी उपस्थित होते.

### माधुरी पाटील यांना पुरस्कार घोषित



**बेलगाव कुऱ्हे ।** प्रहार सैनिक कल्याण संघाचा इगतपुरी रत्न गौरव पुरस्कार मोडाळे येथील जिल्हा परिषद आदर्श शाळेच्या आदर्श शिक्षिका माधुरी केवळराव पाटील शेवाळे यांना पुरस्कार घोषित झाला आहे. प्रहार सैनिक कल्याण संघाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी सैनिक विजय कातोरे यांनी पुरस्काराची नुकतीच घोषणा केली. इगतपुरीरत्न गौरव पुरस्कार सन्मान सोहळा २७ एप्रिल रोजी घोटी आडवन रोडवरील मातोश्री लॉन्स येथे सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात करण्यात आला आहे.

### रद्दी विक्रीसाठी निविदा सादर करण्यास मुदतवाढ

**नाशिक ।** सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नाशिक या कार्यालयातील कालबाह्य कागदपत्रे व रद्दी विक्री करण्यासाठी १५ एप्रिल २०२५ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु विहित मुदतीत निविदा प्राप्त न झाल्यामुळे सात दिवसांची मुदतवाढ देण्यात येवून इच्छुकांनी आपल्या निविदा बंद पाकिटात प्रति किलोप्रमाणेचे दर दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत प्रादेशिक कार्यालय, रामकृष्ण परमहंस मार्ग, टपाल पेटी क्रमांक ४५६, नाशिक-२ कार्यालयात सादर कराव्यात, असे आवाहन सहसंचालक अनिल गावित यांनी केले आहे. सदर विक्री करावयाची रद्दी सुटीचे दिवस वगळून २१ एप्रिल २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत बघता येईल. वेळेनंतर प्राप्त निविदांचा विचार करण्यात येणार नाही. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा २२ एप्रिल २०२५ रोजी दुपारी २ वाजता उघडण्यात येतील. याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयात संपर्क साधावा, असेही सहसंचालक श्री. गावित यांनी कळविले आहे.

### न्यू मराठा हायस्कूलमध्ये डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे न्यू मराठा हायस्कूल नाशिक मध्ये डॉ.




बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर शिंदे हे होते.व्यासपीठावर जेष्ठ शिक्षक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमा पुजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.विद्यालयाच्या जेष्ठ शिक्षिका मोनिका वडजे यांनी आपल्या मनोगतातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय सांगितला. अध्यक्षीय मनोगतातुन ज्ञानेश्वर शिंदे यांनी डॉ. बाबासाहेबआंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' किंवा 'आधुनिक भारताचे निर्माते' असेही म्हणतात हे सांगितले. सूत्रसंचालन व आभार मोनिका वडजे यांनी मानले.फलक लेखन रुपाली शेडगे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## मंगेशकर रुग्णालयासंदर्भात अहवाल जाळून टाकायला हवा : सुप्रिया सुळे



■ **मुंबई :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालय आणि डॉ. घैसास यांना वाचवणारा अहवाल जाहीर झाला आहे. त्याचा आम्ही निषेध करतो. या संदर्भात आमचे सहकारी प्रशांत जगताप हे न्यायालयात जात आहेत. त्यामुळे त्याचे मी जाहीर आभार मानते. एखाद्याची लेक, बायको, आई गेली आहे. असे असताना एखादा रिपोर्ट इतका चुकीचा कसा येऊ शकतो? असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला. एखादे सरकार महिलेबद्दल इतके असंवेदनशील कसे होऊ शकते? हे धक्कादायक असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

आम्ही तो अहवाल मानत नाही. त्या अहवालाला कचऱ्याच्या डब्यात नाहीतर जाळून टाकले पाहिजे, अशा शब्दात सुप्रिया सुळे यांनी संताप व्यक्त केला. प्रशांत जगताप या संदर्भात न्यायालयात लढत आहेत. आम्ही देखील त्यांच्या पाठीमागे ताकतीने उभे राहणार असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. जोपर्यंत त्या महिलेला न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. सरकार माणुसकी विसरले असेल, मात्र आम्ही माणुसकी विसरलो नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

जर असा खोटा रिपोर्ट केला जात असेल तर तो करणाऱ्यांना देखील सहआरोपी करायला हवे, सरकारने कितीही कसाही निर्णय घेतला तरी माणुसकीच्या नात्याने न्याय मिळावा यासाठी आम्ही प्रयत्न करू, एका लेकीची हत्या होते आणि आरोपींच्या पाठीशी हे सरकार उभे राहिले, हे अतिशय धक्कादायक आणि दुर्दैवी असल्याचे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

जाहीर झालेल्या या अहवालावर आमचा विश्वासच नाही. त्यामुळे अहवालात काय आहे? काय नाही? यामध्ये आम्ही वेळ घालवणार नाही. आमच्या राज्यात एका बहिणीची हत्या झाली आहे. त्या राज्यात आम्ही पुन्हा दुसऱ्या लेकीची किंवा महिलेची हत्या होऊ देणार नाही. ज्यांनी आमच्या लेकीची हत्या केली, त्यांना शिक्षा मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नसल्याचे त्या म्हणाल्या.

## हिंदी जबरदस्ती कशासाठी?



■ **मुंबई :** महाराष्ट्र सरकारने एक शासन आदेश (जीआर) जारी केला आहे. ज्यामध्ये घोषणा करण्यात आली की, मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी मराठी आणि इंग्रजीसोबत हिंदी ही अनिवार्य तृतीय भाषा म्हणून सुरू केली जाईल. या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी २०२५-२६ शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिली साठी सुरू होणार आहे, ज्यामध्ये २०२८-२९पर्यंत हळूहळू बारावीपर्यंतचे सर्व वर्ग समाविष्ट केले जातील. मात्र, याला आता विरोधी होत आहे. हिंदी जबरदस्ती कशासाठी? असे म्हणत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

या संदर्भात आव्हाड यांनी एक पोस्ट शेअर करत या बाबत सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये हिंदीला राज्य भाषेचा दर्जा देण्यात आलेला आहे. तर राष्ट्र भाषेचा दर्जा देण्यात आलेला नाही, त्यामुळे या संदर्भात सक्ती करण्याची आवश्यकता नसल्याचे आव्हाड यांनी म्हटले आहे.

## दलालांनो कुठे फेडाल हे पाप?

राजू शेट्टींचा संतप्त सवाल



**कोल्हापूर :** परभणी जिल्ह्यातील शेतकरी दाम्पत्याने आत्महत्या केली. मयत शेतकरी महिला 7 महिन्याची गरोदर होती. ज्याने जगही बघितलं नव्हत त्या आसराफ जीवाला आईच्या गर्भातच आत्महत्या करावी लागली. तरीही तुम्हाला पाझर फुटत नाही का? असा संतप्त सवाल शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी उपस्थित केला. उद्योगपतीच्या दलालांनो कुठे फेडाल हे पाप? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

देशातील उद्योगपतींचे कर्ज माफ केले जात असून शेतकरी कर्ज माफीला मात्र, नकार दिला जात असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी एका पोस्टच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री निर्मला सीतारमण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रश्न विचारले आहेत. यामध्ये त्यांनी शेतकरी आत्महत्याचे चित्र मांडत पुन्हा एकदा शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची मागणी केली आहे. देशातील मुठभर उद्योगपतींच्या १६ लाख कोटी कर्जावर तुम्ही पाणी सोडता मग शेतकऱ्याचे कर्ज तर त्याच्या दोन टक्के सुद्धा नसल्याचे शेट्टी यांनी म्हटले आहे.

# आपले सरकार पोर्टवरील सेवा....

# दिरंगाई झाल्यास कारवाई

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे निर्देश : दरदिवशी बसणार १ हजार रुपयांचा दंड

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१९ :** आपले सरकार पोर्टलवर अधिसूचित सेवा उपलब्ध करण्यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांना दरदिवशी १ हजार रुपयांचा दंड लावण्यात येणार आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता आपले सरकार पोर्टलवरील शासकीय सेवा अधिक गतीने होणार आहेत. या बैठकीत सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या आपले सरकार पोर्टलच्या तक्रारी आणि त्यावर होत असलेल्या कारवाईच्या अनुषंगाने चर्चा झाली.

राज्य शासनाने सेवा हक्क अधिनियमांतर्गत १०२७ सेवा अधिसूचित केल्या असून त्यापैकी ५२७ सेवा ह्यआपले सरकारह्व पोर्टलवर उपलब्ध आहेत. सर्वसामान्य नागरिकांना शासकीय सेवा पुरवण्यासाठी आणि सरकारी कार्यालयातील येणाऱ्या अडचणींच्या तक्रारी करण्यासाठी सरकारने आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲप ही सेवा सुरू केली आहे.

या बैठकीत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना, आपले सरकार पोर्टलवरील अधिसूचित सेवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कार्यान्वयन, ॲग्रीस्टॅक उपक्रम यांचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. आपले सरकार पोर्टलवर विविध विभागांच्या १३८ इंटिग्रेटेड सेवा ३१ मे पर्यंत उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी सचिवांना दिल्या आहेत. तसेच उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन कराव्यात, असेही यावेळी निर्देश देण्यात आले आहेत.

'आपले सरकार' हा महाराष्ट्र शासनाचा एक उपक्रम आहे, ज्याचा उद्देश नागरिकांना विविध शासकीय सेवा अधिक पारदर्शक, सुलभ आणि कार्यक्षम पद्धतीने ऑनलाइन उपलब्ध करून देणे आहे. या पोर्टलच्या माध्यमातून नागरिक जन्म, मृत्यू, उत्पन्न आदी प्रमाणपत्रे, परवाने व अन्य अनेक सेवा घरबसल्या अर्ज करून मिळवू शकतात. तसेच, यात एक तक्रार निवारण यंत्रणाही समाविष्ट आहे, जिच्या साहाय्याने नागरिक त्यांच्या समस्या व तक्रारी संबंधित सरकारी विभागांपर्यंत पोहोचवू शकतात. 'आपले सरकार' पोर्टल आणि मोबाईल ॲपद्वारे या सेवा उपलब्ध असून, यामुळे नागरिकांची सरकारी कार्यालयांना वारंवार भेट देण्याची गरज कमी होते आणि संपर्क सुलभ होतो.

## भाजप युवा मोर्चाची काँग्रेस भवनवर धडक

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :** नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी काँग्रेस पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना नोटीस पाठवली आहे. या विरोधात काँग्रेसच्या वतीने ठिकठिकाणी आंदोलन सुरू असतानाच आता भाजप देखील आक्रमक झाला आहे.

पुण्यात भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या नेतृत्वात काँग्रेस भवनावर जाऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला. त्यामुळे काँग्रेसच्या शहराध्यक्षांसह कार्यकर्त्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने काठ्या दगड हातात घेऊन काँग्रेस भवन समोर उभे राहिले. दरम्यान पोलिसांनी मोठा बंदोबस्त काँग्रेस भवन आणि बालगंधर्व चौकात तैनात केला. भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी बालगंधर्व चौकात रास्ता रोको करत काँग्रेस भवनच्या दिशेने कुच केली, मात्र पोलिसांनी कार्यकर्त्यांची धरपकड करत त्यांना पोलिस ठाण्यात नेल्याने पुढील अनर्थ टळला.

याबाबत काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले, पुणे शहरातील राजकीय संस्कृती मध्ये अशाप्रकारे कधी घटना घडली नाही. अनेक ऐतिहासिक चौक येथे राजकीय पक्षांना आंदोलन करता येते. भाजप युवा मोर्चा तिसऱ्यांदा आज काँग्रेस पक्ष कार्यालय याच्यावर चालून येत आहे. मागील वेळी काँग्रेस भवन मध्ये आम्ही उपस्थित नसताना त्यांनी काँग्रेस भवन मध्ये शिरून मोडतोड केल्याचा प्रकार घडला होता .

याबाबत आम्ही पोलिसांना रीतसर लेखी तक्रार दिली होती. तसेच सीसीटीव्ही फुटेज देखील दिले होते. मात्र, पोलिसांनी कोणतीच कारवाई केली नाही अथवा भाजपच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा देखील दाखल केला नाही. यावेळी आम्ही जशास तसे उत्तर देण्यासाठी सज्ज आहे. काँग्रेस भवनचे संरक्षण करण्यासाठी आम्ही समर्थ असल्याचे ते म्हणाले.

## साडेचार लाख शिधा पत्रिकेची पडताळणी होणार

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि.१९ :** जिल्ह्यात महसूल विभागाच्या वतीने जिल्ह्यातील साडे चार लाख शिधापत्रिकेची पडताळणी प्रारंभ करण्यात आली आहे. या मोहिम अंतर्गत मागितलेल्या कागदपत्रांची पूर्तता लाभार्थीनें केली नाही तर त्याचे थेट रेशनकार्डच रद्द केले जाणार आहे. ही मोहीम जिल्ह्यात १ एप्रिल पासून प्रारंभ केली आहे. या मोहिमेचा समारोप ३१ मे रोजी केला जाणार आहे.

जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत अंत्योदय, प्राधान्य कुटुंब लाभार्थी आणि शुभ्र प्रकारातील सर्व रेशन काडार्ची तपासणी करण्यासाठी महसूल विभागाने तलाठी व रेशनकार्ड दुकानदार यांना आदेश जारी केले आहे. ही माहिती देतांना तलाठी व रेशन दुकानदार ऑनलाइन फॉर्ममध्ये विविध प्रश्न नोंदवणार आहे. यात रेशन कार्डधारक कुटुंबातील प्रत्येक सदस्यांची माहिती, सर्वांची आर्थिक स्रोतांतील एकूण वार्षिक उत्पन्नाची माहिती व संबंधित भागात वास्तव्यास असल्याचा कोणताही एक पुरावा सादर करावा लागणार आहे. जर रेशन कार्डधारकांनी मागितलेल्या कागदपत्रांपैकी कोणत्याही प्रकारचे आवश्यक पुरावे सादर करण्यात अपयशी ठरले, तर त्यांचे रेशन कार्ड तत्काळ रद्द करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

तपासणी करताना १ लाखावर वार्षिक उत्पन्न असलेले, शासकीय, निमशासकीय कार्यालय, खासगी कंपनीतील कर्मचारी, कामगारांकडे पिवळे, केशरी रेशन कार्ड आढळून आल्यास, रेशन कार्ड तत्काळ अपात्र ठरवून रद्द करण्यात येईल. त्यांच्या उत्पन्नानुसार त्यांना दुसरे रेशन कार्ड देण्यात येणार आहे. अपात्र रेशनकार्ड शोध मोहिमेत रेशन कार्डधारकांचे वार्षिक उत्पन्नासह रहिवासाबाबत पुरावे घेण्यात येणार आहेत. पुरावे सादर करू न शकलेल्या रेशन कार्डधारकांना नोटीस देऊन १५ दिवसांचा कालावधी देण्यात येईल. त्यानंतरही पुरावे सादर न केल्यास रेशन कार्ड रद्द करण्याची कारवाई जिल्हा पुरवठा विभागाकडून करण्यात येणार आहे.

अपात्र शिधापत्रिका शोध मोहिमेअंतर्गत तहसीलदारांना पत्र देण्यात आले असून, तलाठी व रेशन दुकानदारांच्या मदतीने ही मोहीम राबवली जाणार असल्याचेजिल्हा पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे यांनी सांगितले .

### महापालिकेने सुनावणीपूर्वीच मंदिर तोडले...

# जैन समाजाचा मुंबईत विराट मोर्चा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१९ :** न्यायालयातली सुनावणी होण्यापूर्वीच मुंबई महापालिकेने जैन समाजाचे विलेपार्ले येथील मंदिरावर तोडक कारवाई केली. त्यामुळे लाखो जैन समाजबांधव रस्त्यावर उतरलेत.

विशेष म्हणजे या मोर्चालाकॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार पराग अलवाणी, जैन समाजाच्या संतांनी पाठिंबा दिला आहे. अखिलेश यादव यांनी सुद्धा या कारवाईवरून भाजपला धारेवर धरले होते. विलेपार्ले पश्चिम रेल्वे स्थानकापासून अतिशय शांततेत हा मोर्चा निघाला. या मोर्चात प्रचंड संख्येने समाजबांधव सहभागी झालेत. महापालिकेच्या कारवाईविरोधात त्यांनी अहिंसक मार्गाने आपला रोष व्यक्त केला आहे.

मुंबईतल्या विलेपार्ले पूर्वमधील कांबळीवाडी येथील ३० वर्ष जुने पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर होते. या मंदिरावर महापालिकेच्या पथकाने कारवाई केली. महापालिकेने या कारवाईपूर्वी मंदिराला एक नोटीस पाठवली होती. याविरोधात एक याचिकाही दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर १७ एप्रिल रोजी सुनावणी होणार होती. त्यामुळे मंदिरावर कारवाई करू नका, अशी विनंती लोकांनी आणि भाविकांनी केली. मात्र, ही सुनावणी होण्यापूर्वीच ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे जैन समाजबांधव आक्रमक झालेत. त्यांनी अहिंसक मार्गाने आपला रोष आज शनिवारी व्यक्त केला.

मंत्री मंगलप्रभात लोढा या आंदोलनात सहभागी झालेत. काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड मीडियाशी बोलताना म्हणाल्या की, जैन समाज शांतीप्रिय आहे. त्याचा आवाज कधी ऐकला होता का? पण त्यांनाही आज रस्त्यावर उतरावे लागले. ही कारवाई पूर्वनियोजित होती. हे षडयंत्र आहे. याविरोधात शांतताप्रिय जैन समजाला रस्त्यावर उतरावं लागले.

# प्रभावाखाली नाही, प्रकाशाखाली या..

### स्वामी श्रीकंठानंद यांचे पत्रकारांना मार्गदर्शन

## व्हॉईस ऑफ मीडियाच्या पहिल्या राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनचे थाटात उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि.१९ :** प्रभावाखाली न राहता प्रकाशाखाली यायला हवं, अशा मर्मदर्शी आणि प्रेरणादायी शब्दांत स्वामी श्रीकंठानंद यांनी महिला पत्रकारांना विचारांची दिशा दिली. व्हॉईस ऑफ मीडिया व व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. हे अधिवेशन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे संपन्न झाले.

स्वामींनी आपल्या भाषणात सांगितले की, महिलांनी आपली ओळख सामान्यत्वात शोधली पाहिजे. मी जशी आहे, तशी मी अनुभवायला आले आहे, हा आत्मस्वीकार महत्त्वाचा आहे. आपण सर्वज्ञ नाही, हे मान्य करणं म्हणजेच खऱ्या अर्थाने आत्मबळ निर्माण करणं. साधेपणा असेल, तर मंदिरात जाण्याची गरज भासत नाही. खऱ्या अर्थाने आध्यात्मिकतेचा प्रकाश आपल्या कृतीतून दिसावा लागतो, असे स्पष्ट करीत पत्रकारितेच्या भूमिकेबाबत ते म्हणाले की, आज चार अँकरपैकी तीन महिला आहेत, ही स्थिती महिलांच्या प्रगतीचे द्योतक आहे. पण ही संधी उपयोगी ठरवण्यासाठी महिलांनी आपण ही भूमिका कशी पार पाडणार? याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. सकाळ-संध्याकाळ स्वतःवर काम करणं, आत्ममंथन करणं आवश्यक आहे.



स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या टीका-टिप्पण्यांकडेही त्यांनी लक्ष वेधले. स्वतःला सहनशील बनवलं, तर कोणताही त्रास त्रास वाटत नाही, असं सांगत त्यांनी मानसिक सामर्थ्य वाढवण्यावर भर दिला. बुद्धिमत्ता पुरेशी नाही, ती हृदयवाणी झाली पाहिजे. विचार मोठा असावा आणि मानसिक आहार सकस असावा. रोज ध्यान करा, स्वतःसाठी वेळ ठेवा. अहंकार दूर होतो आणि आपण व्यापक होतो, हे त्यांच्या विचारांचे सार होते.

**दुर्गाताई तांबे यांचा अनुभवसंपन्न सल्ला**

यावेळी माजी नगराध्यक्षा मा. दुर्गाताई तांबे यांनीही आपले विचार मांडले. त्यांनी सांगितले की, पूर्वी महिला पत्रकार होणं हे फार मोठं आव्हान होतं. पण आज परिस्थिती बदलली आहे. महिलांनी आपली जागा निर्माण केली आहे. घटनेने महिलांना संधी दिली, तर घरच्या पाठिंब्यामुळे त्या त्या संधीचा पुरेपूर उपयोग करू शकतात.

दुर्गाताईंनी भारतातील यशस्वी महिला पत्रकारांचा अभ्यास करण्याचा सल्ला देत नवोदित महिला पत्रकारांना योग्य दिशा दाखवण्याचे आवाहन केले.

या उद्घाटन सोहळ्यास दुर्गाताई तांबे, मोनिका राऊत पोलीस उपायुक्त, नाशिक, व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, व्यंकटेश जोशी सामाजिक कार्यकर्ते व शेतीनिष्ट, राष्ट्रीय सरचिटणीस दिव्या भोसले, प्रेरक वक्ते स्वामी श्रीकंठानंद, मोनिका राऊत पोलीस उपायुक्त नाशिक, सोहन माचरे पोलीस अधिकारी, व्हॉईस ऑफ मीडिया व व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी तसेच अनेक क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार, महिला आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या अधिवेशनाच्या माध्यमातून एक महत्त्वाचा संदेश पुढे आला, प्रभावाखाली नव्हे, तर विचारांच्या आणि सकारात्मकतेच्या प्रकाशाखाली काम करा. महिला पत्रकारिता हे केवळ व्यवसाय नाही, तर समाजाला दिशा देणारी शक्ती आहे, हे अधिवेशनात ठळकपणे अधोरेखित झाले. राज्यभरातून सर्व पदाधिकारी महिला या अधिवेशनात आल्या होत्या.

> अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ट्रेनर गजेंद्र मेढी यांच्या मार्गदर्शनात राज्यभरातून आलेल्या महिला पत्रकारांची कार्यशाळा संपन्न झाली. या दुसऱ्या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे इस्रोच्या चांद्रयान ३ मोहिमेच्या प्रमुख वरिष्ठ शास्त्रज्ञ माधवी ठाकरे यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काँग्रेसचे आंदोलन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१९ :** केंद्र शासनाने अलीकडे चालवलेल्या द्वेषपूर्ण व सूडबुद्धीने केलेल्या कारवाईचा निषेध करण्याकरिता अमरावती शहर व जिल्हा काँग्रेसच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. या वेळी तीव्र नारेबाजी करून भाजप सरकारचा निषेध व्यक्त केला. तसेच काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

भाजपप्रणीत केंद्र शासनाने द्वेषपूर्ण भावनेतून व सूडबुद्धीने नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राची मालमत्ता मनमानी पद्धतीने जप्त केली. तसेच काँग्रेस नेत्या खा. सोनिया गांधी, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी व इतर ज्येष्ठ नेते मंडळीविरुद्ध सत्तेचा दुरुपयोग करून न्यायालयात चार्जशीट दाखल करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय हा लोकशाही परंपरेला घातक असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

या अन्यायकारक निर्णयाच्या विरुद्ध राज्यस्तरावर काँग्रेसच्या वतीने आंदोलन केले जात आहे. त्याअनुषंगाने शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हा कचेरीसमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी केंद्र शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या वेळी खा. बळवंत वानखडे, शहराध्यक्ष बबलू शेखावत, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, प्रदेश सचिव आसिफ तवक्कल, माजी महापौर अशोक डोंगरे, मुन्ना राठोड, हरिभाऊ मोहोड, पंकज मेश्राम, अब्दुल रऊफ, अभिनंदन पेंढारी, सोमेश्वर मुंजाळे, डॉ. मतीन अहमद, हुसेन खान, राजू भेले, प्रकाश पहुरकर, संजय बोबडे, शोभा शिंदे, सुजाता झाडे, जावेद साबीर आणि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर, ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com